

१८८८

म. ग्रं. सं. ठाणें.

विषय काव्य

सं. क्र. 2382

REFBK-0022513

-सी. म. बापट

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2362
दा. क्र. 22593
ग्रंथ शाखा (स्थळ

*With Best Compliments*

With Best Compliments

REFBK-0022513
REFBK-0022513

२३८२ काव्य
२२५९३

श्री ज्ञानेश्वर जन्म सप्तशताब्दी सोहळ्यानिमित्त
विशेष प्रकाशन

# गीत - ज्ञानेश्वर



— कवी —

आचार्य सी. म. बापट

आवृत्ति १ ली )

रणझुंझार प्रकाशन
बेळगांव

मत ४ रुपये

● प्रकाशक –

शंकर रा. कालकुंद्रीकर
रणझुंझार प्रकाशन
ममता सदन, तानाजी पथ
बेळगांव. – १

● पहिली आवृत्ती
दि. १९ मे १९७७
ज्येष्ठ शुद्ध १ शके १८९९.

● सर्व हक्क लेखकाधीन

● किमत ४ रुपये

● मुद्रक –

शिवाजी रा. कालकुंद्रीकर
विक्रांत प्रिंटर्स,
पार्वती कुंज, हिंदवाडी
बेळगांव. – ११

2352 काव्य
22493

# गीत – ज्ञानेश्वर

## अनुक्रमणिका


| गीताचे नांव | पान |
|---|---|
| धन्य ही ज्ञानेश्वर माउली | १ |
| १ गात मी ज्ञानेश्वर – चरिता | ३ |
| २ मुक्ति धाम हो आळंदी | ५ |
| ३ तो देव दयाळू आहे ! | ७ |
| ४ बाळयोगी शोभला | ९ |
| ५ रंगले न संसारी त्या | १० |
| ६ निघाला विठ्ठल काशीला | १२ |
| ७ द्या मला अनुग्रह गुरुदेवा ! | १४ |
| ८ अंगणीं खिन्न उभी रुक्मिणी | १६ |
| ९ रुक्मिणी पतिचिंतनीं रंगली | १८ |
| १० संथ वाहते गंगा | २० |
| ११ आली वट पौर्णिमा | २२ |
| १२ उठले वादळ आळंदीला | २४ |
| १३ माणूस म्हणोनी जगू द्या मला | २६ |
| १४ इंद्रायणिच्या तटीं | २८ |
| १५ धेनु घरीं आणावी हो ! | ३० |
| १६ रंगला संसार संन्याश्याचा | ३२ |
| १७ देवाघरच्या सुंदर ज्योती | ३४ |
| १८ घडावा तीर्थ क्षेत्रीं वास ! | ३६ |
| १९ मानव हा आहे वैरी ! | ३८ |
| २० प्रभो, ही नम्र तुला प्रार्थना | ३९ |
| २१ ज्ञानदेव जागा झाला | ४१ |
| २२ दीनवाणी चार बाळे | ४३ |
| २३ न्याय द्यावा आम्हांला हो ! | ४५ |
| २४ पैठणचा बालेकिल्ला | ४७ |
| २५ सांगती ज्ञानेश्वर गीता | ४९ |
| २६ जय जय ज्ञानराज बोला! | ५१ |
| २७ उघड दार ज्ञानदादा ! | ५३ |
| २८ गोड मांडे खावयाला | ५५ |
| २९ चांगदेवा गर्व झाला | ५७ |
| ३० विठ्ठल सावळा विसावा जिवाचा | ५९ |
| ३१ प्रेम निधी ज्ञानराजा | ६१ |
| ३२ पुत्र अमृताचा | ७१ |
| ३३ अंतरिचे गुज | ७२ |
| पसाय दान | ६४ |
| हरिपाठाचे अभंग | ६५ |

'गीत – ज्ञानेश्वर' प्रकाशनाच्या निमित्ताने

# ज्ञानेश्वर जन्म सप्तशताब्दी सोहळा

# एक सिंहावलोकन

बेळगांव शहरातच नव्हे तर बेळगांवचा साराच परिसर दि. १४ ते २० मे १९७६ या सात दिवसात ज्ञानेश्वरीमय झाला होता. श्री ज्ञानेश्वर महाराज जन्म सप्त शताब्दी महोत्सव' बेळगांवकरांनी करण्याचे ठरविले. त्यासाठी संभाजी उद्यानातील भव्य प्रांगणात सुमारे २२५ फूट लांब व ११५ फूट रुंद असा भव्य मंडप उभारून तेथे ज्ञानेश्वर – नगरी तयार केली.

मंडप उभारण्याचे काम येथील मंडप कॉन्ट्रॅक्टर श्री. नेसरीकर बंधु यांनी केले. त्यावर मंदिरस्वरूप सुरेख सजावट कमानी, शिखर उभारण्याचे काम येथील ख्यातनाम कलाकार प्रेमसिंग नरगुंदकर बंधु यांमी केले. तर आकर्षक विद्युत रोषणाई श्री. सूर्यबंशी यांची होती या तिघांनी ज्ञानेश्वर – नगरी भक्तीपूर्वक व परिश्रमाने उभारली होती

उत्सवाच्या प्रारंभी सतत १५ दिवस दै. रणझुंझारने खास करून या सोहळ्याची पार्श्वभूमि तयार करण्याचे व जनतेसमोर ज्ञानेश्वर–चरित्र ठेवण्याचे जे कार्य, केले त्यामुळे या एकंदर सोहळ्यास एक वेगळाच उठाव आला व जनमानसात अधिकाधिक जागृती झाली. संयोजकांच्या सदिच्छेप्रमाणे संभाजी उद्यानास जनसागराचे भरते आले.

दि. १४ ला पहाटे ५ वा. ज्ञानेश्वरांच्या मूर्तीची पूजा अर्चा ह. भ. प. पुरुषोत्तम शामराव गिंडे यांनी यथासांग केल्यावर काकड आरती व भजन होऊन सकाळी ७ वा. पारायणाला सुरुवात झाली. या नगरीत प्रत्येकाला बसण्यासाठी ठराविक जागा दिली होती. येथील उदात्त

वातावरणामुळे स्वयंशिस्त निर्माण झाली होती. पारायणास पहिल्य दिवशी सुमारे ८०० पुरुष ३०० स्त्रिया बसल्या होत्या. त्यात शहापूर, टिळकवाडी, खासबाग, वडगांव, अनगोळ, बेळगांव आदि भागातील तसेच पुण्यामुंबईपासून बेंगलोर पर्यंतचे आलेले भाविक दररोज बसत असत व हे दृश्य पाहण्यासाठी हजारोंचे जथेच्याजथे संभाजी उद्यानाकडे येत असत. पारायणाला तात्यासाहेब वासकर महाराजांचे मार्गदर्शन लाभले होते. पारायणाच्या सहाव्या दिवशी २ हजार ६०० लोकांची उपस्थिती होती तर समाप्तीला मंडपात जागाच नव्हती. एवढा प्रचंड जनसागर जमला होता. संतांच्या जयजयकाराने बेळगांवचा परिसर दुमदूमून सारे वातावरण ज्ञानेश्वर माउलीच्या प्रेमाने भारून गेले होते. ता. १४ ते २० पहाटे ५ वा. पासून रात्रौ अकरा वाजेपर्यंत विविध कार्यक्रमांची योजना केली होती. ज्ञानेश्वरीचे पारायण, भजन, प्रवचन, कीर्तन असा हा विविधांगी कार्यक्रम आखला होता. त्यासाठी आळंदीचे किसन महाराज साखरे, पंढरपूरचे वासकर महाराज, सभापती पागे, पुरुषोत्तम गिंडे, डॉ. प्रा. वा. पु गिंडे यांची सुश्राव्य व उद्‌बोधक प्रवचने कीर्तने झाली. या निमित्ताने आचार्य सी म. बापट कृत 'गीत-ज्ञानेश्वर' हा कार्यक्रम व महिला मंडळांची भजनेही आयोजित केलेली होती.

वडगावला .९५३ मध्ये पुरुषोत्तम शामराव गिंडे यांच्या निवासस्थानासमोर एक महिनाभर पारायण व ज्ञानसत्र सोहळा झाला होता. त्यानंतर असा हा भव्य सोहळा प्रथमच घडून आला. दि. २० रोजी निघालेल्या सोहळ्याच्या समाप्तीची दिंडी अपूर्व होती. हत्तीवर अंबारीत ज्ञानेश्वरांचा फोटो आणि ज्ञानेश्वरी ग्रंथ ठेवून टाळ-मृदंगाच्या जयघोषात हजारो स्त्री - पुरुष नाचत होते. बाहेरून आलेल्या मंडळींची रहाण्या - जेवण्याची व्यवस्था चोख होती. शेवटच्या दिवशी १५ हजाराहून अधिक लोकांनी महाप्रसाद घेतला. हे ज्ञानसत्र केवळ बेळगांवकरांच्या सक्रीय, उत्साही साह्यामुळें आणि ह. भ. प. कार्यकर्ते मोहनसिंग रजपूत आणि त्यांचे सारेच कुटुंबीय, लक्ष्मणराव घसारी, कृष्णराव भादवणकर, नामदेवराव भावे, नामदेवराव बोंगाळे, दत्तोपंत वरुडे, डॉ. यड्डूर, कल्लाप्पा बंगोडी, दत्तोपंत पवार यांचे अमाप परिश्रम

यामुळेच हे महत् कार्य सिद्धीला गेले. असा हा अविस्मरणीय सोहळा असंख्य बेळगावकरांच्या स्मृतिपटलावर कायमचा कोरला गेला. त्या सोहळ्याचे विस्मरण केवळ अशक्य, असे म्हटले तरी ती अतीशयोक्ती ठरणार नाही.

या सोहळ्याचे आणि ज्ञानेश्वर महाराजांचे सतत स्मरण घडावे म्हणूनच मंडळाने ज्ञानेश्वर पारायणाचा दरवर्षी असा सोहळा आयोजित करण्याचा संकल्प केलेला आहे माउलींच्याच प्रेरणेने आणि श्री. पुरुषोत्तम शामराव गिंडे याच्या मार्गदर्शनाखाली हा उत्सव याही वर्षी संभाजी उद्यानात प्रतिपंढरीचे स्वरूप प्राप्त करुन देणारा ठरणारा आहे. सारे कार्यकर्ते झपाट्यानें व जिद्दीने कामाला लागले आहेत. प्रसिद्धीच्या झोतात न राहता निरलसपणे कार्यकरणाऱ्या कार्यकारी मंडळातील पुढील व्यक्तीचा उल्लेख महत्वाचा ठरेल.

**– कार्यकारी मंडळ –**

१) लक्ष्मणराव घसारी - अध्यक्ष २) मोहनसिंग रजपूत - उपाध्यक्ष ३) कृष्णराव भादवणकर - सेक्रेटरी ४) ज्ञानेश्वर बोंगाळे, वकील ५) कल्लापण्णा बंगोडी ६) दत्तुसा गो. पवार ७) बागेश्री एल. बेळगांवकर ८) नामदेव य. सदरे ९) एकनाथ सरोदे
१०) तुकाराम भ. पाटील ११) रामकृष्ण जाधव १२) शामराव मोदगेकर १३) मारुतीराव ल. घसारी १४) महादेव अ. पाटील १५) खिरोजी प. सांबरेकर. सेवावृत्तीने या सोहळ्यात सहभागी होऊन या कार्यक्रमाची यथासांग समाप्ती होईपर्यंत त्यांनी घेतलेल्या श्रमाचे अभिनंदन करणे आम्हां सर्वांचेच कर्तव्य आहे. या सर्वांनी आपल्या कार्यातून इतरे जनांना सहकार्याची प्रेरणा द्यावी हीच अपेक्षा.

अशा या कार्यक्रमांतूनच ज्ञानेश्वर माउलीच्या कृपेने भाषा, पक्ष, पंथ, भेद सारे गळून पडतात आणि एक वेगळे भावविश्व तयार होते. राष्ट्रीय एकात्मतेची भावना राजकारणाच्या व्यासपीठावरून दुभंगते तर अशा आध्यात्मिक भक्तीच्या व्यासपीठावरून अधिक दृढ होते

याचाही प्रत्यय याठिकाणी आला. संतांच्या जीवनात व त्यांच्या पावन विचार-धारेत सर्व मानवांच्या मनातील मलीन भावना नष्ट करून पावित्र्याची जोपासना निर्माण करण्याची शक्ती आहे.

दैनंदिन संघर्षमय जीवनातून निर्माण होणारा राग, लोभ, द्वेष, माया, मत्सर, दंभ यांचा विनाश होऊन दया, प्रेम, ममता, सौजन्य व सहकार्य यांचा अविष्कार घडवून आणण्याचे सामर्थ्य श्रीज्ञानेश्वरांच्या जीवन चरित्रात, आणि ज्ञानेश्वरीच्या अमृतमधुर शब्दांत आणि तिच्या पवित्र प्रेरक विचार धारेत आहे. याचसाठी भक्त-जनांचा मनोविकास साधून जीवनात राष्ट्रीय एकात्मतेची व मानवतेची भावना सतत जोपासण्याचे काम अशा या ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यासारख्या कार्यक्रमांतून मिळणार आहे. त्यातूनच ते अधिकाधिक वृद्धिंगत होणार आहे. याचसाठी आज हवे आहे ज्ञानेश्वर माऊलीचे चिंतन, ज्ञानेश्वरीचे वाचन आणि पूजन !

याच एका उदात्त हेतूने दै रणझुंझारच्या सौजन्याने, आचार्य सी. म. वापट लिखित 'गीत ज्ञानेश्वर' या ज्ञानेश्वरांच्या काव्यमय जीवन-चरित्र ग्रंथाचे प्रकाशन करण्याचे आम्ही योजिले आहे. आचार्य सी. म. वापट हे नामवंत साहित्यिक म्हणून प्रसिद्ध आहेत त्यांचे चार काव्यसंग्रह आणि इतरही बरीच पुस्तके आतापर्यंत प्रसिद्ध झालेली आहेत. यापूर्वी अनेक संस्थांच्याकडून त्यांच्या पुस्तकांना पारितोषिकेही मिळालेली आहेत. आकाशवाणीवरून त्यांची गीते नेहमी ध्वनिक्षेपित केली जातात. करवीर व संकेश्वर पीठाचे श्रीमत् जगत्‌गुरु श्रीशंकराचार्य महाराज यांनी त्यांना बहुमानपूर्वक 'कविशेखर' ही पदवी दिली आहे. श्री वापट यांचे काव्य प्रासादिक आणि भाषाशैली सहज सुंदर आहे. त्यांची शब्द रचना सुटसुटीत, समजण्यास सोपी आणि रसपूर्ण असते. वर्ण्य प्रसंगाचे चित्रण समर्पक रीतीने करण्याचे कौशल्य त्यांच्या लेखणीत खास आहे. 'ज्ञानेश्वरी' पठणाचा त्यांचा व्यासंगही दीर्घ-कालीन आहे. त्याचे प्रत्यक्ष फळ म्हणजे त्यांना स्फुरलेली 'गीत-ज्ञानेश्वर' ही सुंदर काव्यमाला ! असंख्य भाविक जनांच्या आग्रहा-

वरून ही गीतमाला प्रकाशित करण्याचा सुयोग आज येत आहे.

ही गीतमाला प्रकाशित करण्यामध्ये मला खरी प्रेरणा माझे ज्येष्ठ स्नेही श्री. मोहनसिंग रजपूत आणि माझे बंधुद्वय श्री. मनोहर (सं. रणझुंझार) आणि श्री. शिवाजी (विक्रांत प्रेस) तसेच येथील सुप्रसिद्ध कवि श्री. गोविंद केळकर यांचेकडून मिळाले. म्हणूनचं केवळ आठ दहा दिवसांच्या अल्पावधीत हे पुस्तक प्रकाशात येऊ शकले अन् हा सुद्धा एक चमत्कारच मानावा लागेल !

श्री. ज्ञानेश्वरांच्या जीवनाचा संदेश घरोघरी पोचविण्याच्या कामी हा आमचा एक अल्पसा प्रयत्न आहे. 'ज्ञानेश्वर माउलीं' ची सेवा घडावी याच सदिच्छेने आज सादर करीत आहोत

**" गीत - ज्ञानेश्वर "**

दि. १५/५/१९७७

'ममता सदन' तानाजी पथ

बेळगांव.

— शंकर रा.

।।



## सेवक

।।२।।

सेवक मी

वाहिला जि

संसार विश ।।३।।

त्याग सर्व

राहता र !'

ग्रनी अंजळी ।।४।।

संतांची।।


तिची इच्छा

ळीं ।।५।।

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे



सतत
कार्यक्रमा
होणार आहे.
ज्ञानेश्वरीचे वाचन



याच एका उ
म. वापट लिखित '
चरित्र ग्रंथाचे प्रकाश
वापट हे नामवंत साहि
आणि इतरही बरीच पु
अनेक संस्थांच्याकडून
आहेत. आकाशवाणी
जातात. करवीर व सं
महाराज यांनी त्यांना ब
श्री वापट यांचे काव्य प्रा
त्यांची शब्द रचना सुटसुटी
वर्ण्य प्रसंगाचे चित्रण स
लेखगीत खास आहे. 'ज्ञाने
कालीन आहे. त्याचे प्रत्यक्ष
ज्ञानेश्वर' ही सुंदर काव्य

## ानेश्वरी पारायण सोहळा
## य चित्रमय दर्शन–

# धन्यही ज्ञानेश्वर माउली !

( नमन )

निवेदन :– कांही वर्षांपूर्वी कवि सी. म. वापट आळंदीस 'माउली' च्या दर्शनास गेले होते. तेथे श्रीज्ञानदेवांच्या समाधीसमोर मंतरलेल्या मन:स्थितीत ते असताना हे गीत त्यांना सहजगत्या स्फुरले. 'गीत-ज्ञानेश्वर' या काव्याचे उगमस्थान या पहिल्या वहिल्या गीतात आहे. म्हणून नमनाच्या स्वरूपात-नांदी-सारखे ते येथे आरंभीं दिले आहे.

जनसेवेचा छंद घेउनी रातंदिन कष्टली
धन्य ही ज्ञानेश्वर माउली ! ।।धृ.।।
इंद्रायणिचे भाग्य उजळले
आळंदीचे गोकुळ बनले
भूवरि आले ब्रह्म सावळे, दंग भक्त मंडळी ।।१।।

'बोल मऱ्हाटा रसाळ माझा
सहज अमृता जिंकित पैजा !'
अमरवाणि ही सार्थ करोनी रसिकमने मोहिली ।।२।।

मर्म निवडुनी गीतार्थाचे
उकलित कोडे संसाराचे
दीन जिवांच्या शिरीं कृपेची नित्य करी साउली ।।३।।

'दुरिताचे तम लोपुनि जावे
अखिल विश्व हे सुखी असावे !'
तनमन वेचुनि जनकल्याणा दिव्यज्योत पाजळी ।।४।।

उभारुनी ध्वज समभावाचा
दावित सकलां पथ मुक्तीचा
मानवतेची करी स्थापना दुनियेच्या राउळीं ।।५।।

## गीत १ ले निवेदन

श्री ज्ञानेश्वरांचे अवघे जीवन अत्यंत अद्‌भुत आणि रोमांचकारी आहे. आळंदीच्या सिद्धबेटात रुजलेल्या या चिमुकल्या अंकुराने सारे त्रिभुवन हां हां म्हणता व्यापून टाकले. 'धन्य ज्ञानेश्वर योग्याची माउली । तेणें निगमवल्ली प्रगट केली' – हे नामदेवांचे उद्‌गार सार्थ आहेत. अमृताशी स्पर्धा करणाऱ्या आपल्या रसाळ वाणीने त्यांनी 'ज्ञानेश्वरी' सारखा अजोड ग्रंथ निर्माण केला आणि मानवतेची ध्वजा अखंड फडकत ठेवली.

आपल्या सद्‌गुरू एवढीच श्रोत्यांच्यावर त्यांची श्रद्धा होती. ते त्यांना 'प्रभूच्या मूर्ती' समजत. या गीताच्या आरंभी श्रोत्यांची प्रार्थना करून संत-सज्जनांच्या उपकाराचे स्मरण केले आहे. कारण त्यांच्याच पुण्याईवर हे जग टिकून आहे. योगिराज ज्ञानेश्वर हे तर सर्व संतांचे मुकुटमणी होत ! 'अवघाचि संसार सुखाचा करीन । आनंदे भरीन तिन्ही लोक' ही आपली प्रतिज्ञा त्यांनी कशी खरी केली, त्याचे हे शब्दचित्र आहे.

---

अगा, विश्वैकधामा । तुझा प्रसाद–चंद्रमा ।
करो मग पौर्णिमा । स्फूर्तीची जी ।।
जी, अवलोकलिया मातें । उन्मेष सागरीं भरितें ।
वोसंडेल स्फूर्तीतें । रसवृत्तीचें ।।

**– श्री ज्ञानेश्वर**

श्री ज्ञानेश्वरांनी ग्रंथ निर्मितीच्या प्रसंगी आपल्या स्फूर्तीला रसवृत्तीचा बहर येण्यासाठी श्रीसद्‌गुरुस्वरूपी प्रभूची आळवणी केली. श्रीज्ञानदेवांना तशीच माझीही विनवणी आहे.

—०—

# १ गात मी ज्ञानेश्वर-चरिता

सकल व्हा, सावधान आता
गात मी ज्ञानेश्वर-चरिता ।।धृ.।।

रसिक तुम्ही हो, थोर मनाचे
कल्पतरू या पृथ्वीवरचे
सुवर्णगिरि जणु सौजन्याचे
बहरे तुमच्या कृपादृष्टिने माझी काव्यलता – १

तुम्ही खरा आधार स्वधर्मा
सदय प्रभूच्या सजीव प्रतिमा
नाही उपमा तुमच्या प्रेमा !
सेवा अपुली सदा घडो हा ध्यास जडे चित्ता – २

बहुत असे ऋण संत-जनांचे
करुनी चंदन निजदेहाचे
दुःख निवारित आर्त जिवांचे
हालाहल ते स्वता सेविता देत सुधा जगता – ३

मुकुटमणी जो संतमुनींचा
सोज्वळ पुतळा वैराग्याचा
अथांग सागर कारुण्याचा
नवा भगीरथ भूवर आणित दिव्यामृत सरिता –४

योगिराज हा क्रांतीदर्शी
तेजोराशी स्वयंप्रकाशी
तत्व दर्शी ते अविनाशी
समताप्रेमी जगमैतर हा गरिबांचा दाता – ५

शांत रसाचा मेघ बोळला
तृषित ममांचा दाह शमविला
मधुर भक्तिचा मळा फुलविला
अज्ञानाचा तम नाशित हा नित्योदय सविता – ६

द्वारीं इवले रोप लाविले
वाढुनि त्याने गगन वेढिले
दरवळती दशदिशा परिमळें
अद्‌भुत प्रज्ञाबल ते दिपवी अवघ्या मतिवंतां ! – ७

रूप साजिरे वयहि कोवळे
मधुमय वचनीं ब्रह्म कवळिले
तिन्ही लोक आनंदें भरिले
भेटविला पंढरिचा राणा प्रेमळ हरिभक्तां – ८

परमार्थाचा साखर मेवा
समभावाने वाटित सर्वां
देत सुखाचा अक्षय ठेवा
अज्ञ-जनांची होउनि आई साधित नित्य हिता – ९

स्वप्न एक मी हृदयीं जपले
शब्दांना ते आज गवसले !
भावपुष्प हे अर्पियले त्या अमर विश्वसंता – १०

# २ मुक्तिधाम ही आळंदी

**निवेदन :–** पावन इंद्रायणीच्या तटाकीं आळंदी ( अलंकापुरी ) हे क्षेत्र शिवपीठ म्हणून पूर्वापार प्रसिद्ध आहे. तेथील निसर्गरम्य आणि पुरातन सिद्धबेटात श्री ज्ञानेश्वरांचे दिव्य जीवन आकाराला आले. आळंदीला त्यांनी निरंजन समाधी घेतल्याने या स्थळाला विशेषच माहात्म्य प्राप्त झाले. भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला उद्देशून गीतेत सांगितलेला निष्काम कर्मयोग ज्ञानदेवांनी स्वत: आचरणात आणला आणि त्यानुसार सर्व जनतेला समत्व बुद्धीने शाश्वत कल्याणाचा मार्ग दाखविला. आळंदी हे ज्ञानपीठ आणि मुक्तिधाम असून मानवतेची पताका तेथे अखंड फडकत आहे. संतमंडळाचे आणि विश्वधर्माचे योगिराज ज्ञानेश्वर हे अध्वर्यु होत ! त्याची साक्ष भाविकांना आळंदीस मिळते !

शांति मना दे परमानंदीं
मुक्तिधाम ही आळंदी ।।धृ०।।

स्थान स्वयंभू शिवशक्तीचे
शांत तपोवन ब्रह्मर्षींचे
माहेरच हे योगसिद्धिचे
दूर करी सकल उपाधी – १

नांदत इंद्रायणी निरंतर
मधुर जलें करि सुरम्य परिसर
तरुवर डुलती तटीं मनोहर
विहरे खगगण स्वच्छंदी – २

श्री सिद्धेश्वर पावन दैवत
सुवर्ण पिंपळ द्वारीं शोभत
योगिराज तो सदैव जागृत
घेत इथे सगुण समाधी – ३

अजानतरु त्याजवळ विराजे
प्रपंचतापें शिणले जन जे
उतरुनि तेथे अपुले ओझे
पावति सुख त्या पुण्यपदीं – ४

करुणामय हा अमर महात्मा
सद्धर्माचा वानित महिमा
स्थल–कालाच्या लंघुनि सीमा
प्रेममंत्र सकलां बोधी – ५

चिन्मय ज्योती नाशुनि तिमिरा
उजळित सारा विश्वपसारा
भव्य उभारुनि ज्ञानमंदिरा
होत चिरंतन सौख्यनिधी – ६

रमवित जीवा अमृत ओवी
वेदाची निज लाभे पदवी
हरिनामाची गात थोरवी
आपपरांचे हित साधी – ७

जन जागृतिचे बांधुनि कंकण
माणुसकीची देता शिकवण
सर्वांचे करि सुंदर जीवन
समतेची घुमवित नांदी – ८

निर्मळ भावें कुणीहि यावे
'माउली' चे या दर्शन घ्यावे
कृपा–प्रसादें पुनीत व्हावे
जावे तरुनी भवजलधी ! – ९

# ३ तो देव दयाळू आहे !

निवेदन :– पैठण जवळच्या आपेगांवी ज्ञानदेवांचे वाडवडील रहात असत. गोविंदराव कुलकर्णी हे त्या घरंदाज कुटुंबातील कर्तबगार व थोर पुरुष. त्यांच्या पत्नीचे नाव नीराबाई. ही उभयता पतीपत्नी सात्विक आणि परोपकारी वृत्तीची होती. परंतु पोटीं संतान नसल्याने ती दोघेही मनातून कष्टी असत. तथापि नाथपंथी योगी श्री गहिनी नाथ यांच्या कृपाप्रसादाने त्यांना पुत्रलाभ झाला. त्याचे नाव विठ्ठल. हेच ज्ञानदेवांचे पिताजी !

मात्र बालपणापासून विठ्ठल हा विरक्त स्वभावाचा होता. इतर मुलांच्या प्रमाणे खेळण्याबागडण्यात त्याचे लक्ष नसे. मुंज झाल्यानंतर तीर्थयात्रेच्या निमित्ताने स्वारी घरातून अचानक पसार झाली. त्यामुळे त्याचे वडील गोविंदराव उदास झाले. साध्वी नीराबाई त्यांना धीर देऊन म्हणे, " तुम्ही निराश होऊ नका. देव दयाळू आहे. तो सर्व कांही ठीक करील ! "

### तो देव दयाळू आहे !

सुशील नीरा म्हणे पतीला, " ध्यानीं बोल धरा हे ! " ।।धृ०।।

गोदाकाठीं क्षेत्र पुरातन
धर्मालय ते विलसे पैठण
कांति सुनिर्मल त्याची तेथिल आपेगावहि लाहे – १

हरिभक्तांचे थोर घराणे
तिथे नांदते नित्य सुखाने
धर्मनिष्ठ गोविंद धनी तो भार कुळाचा वाहे – २

गृहदेवी ती नीरा साध्वी
चित्त पतीचे प्रसन्न ठेवी
जनहितकार्या तयासवे ती सिद्ध उभारुनि बाहे – ३

वाण कशाची नव्हती त्यांना
हाले ना परि घरीं पाळणा
प्रेमळ ते दंपती तळमळे पुत्रसुखाच्या मोहें –४

देत पिलांना चारा चिमणी
पाजित वत्सा धेनु अंगणीं
होत बावरी बघता नीरा, दुःख तरी ती साहे –५

गहिनी नाथा उपजे करुणा
करिती पावन त्या उभयांना
गुरु–कृपेने मनःकामना होत पुरी लवलाहे –६

दिसे प्रतिदिनीं सतेज कांता
रोखुनि तिज गोविंद पाहता
सांगे लाजत त्याला गुज ती स्वप्न मनोहर पाहे –७

बाळ जन्मला विठ्ठल सुदिनीं
प्रमुदित झाली ती पतिपत्नी
योगी बालक तन्मय परि तो आत्मचिंतनीं राहे –८

वैराग्याचा ध्यास घेतला
विठ्ठल तीर्थाटना निघाला
मायबाप ते उदास होती गुणी मुलाच्या विरहें –९

# ४ बालयोगी शोभला

निवेदन :- उत्तर भारतातील प्रमुख तीर्थस्थळे पाहून, कुमार विठ्ठल त्र्यंबकेश्वर क्षेत्राकडे वळला. आत्मशक्तीचा शोध घेणे, हा त्याच्या यात्राभ्रमणातील उद्देश होता. त्र्यंबकेश्वराहून तो आळंदीस आला. तेथील इंद्रायणीच्या निसर्गरम्य तीरावर त्याचे पाऊल स्थिरावले. त्याला तेथे गुंगविण्यात अदृश्य नियतीचा हेतू निराळा होता !

आळंदीचे पिढीजात कुलकर्णी सिद्धोपंत यांनी हा तेजस्वी बालक पाहिला आणि त्याच्याबद्दल त्यांच्या मनात आपुलकी उत्पन्न झाली. विठ्ठलासही त्यांचा निर्मळ स्नेहभाव आवडला. सिद्धोपंतांनी त्याला आपला घरजावई करून घेतला. विठ्ठलाचे आळंदीस आगमन आणि रुक्मिणीशी त्याचे लग्न होणे, हा एक गूढ ईश्वरी संकेत होता !

शांत जागीं एकला तो बालयोगी शोभला
छत्र माथीं पिंपळाचे आसना लाभे शिळा ।।ध्रु.।।

गौरवर्णी देह साजे सोनचाफ्याचा कळा
शारदींचा कोवळा कीं चंद्र ध्यानीं रंगला
सर्व आळंदीकरांना ध्रुव जसा तो भासला – १

संथ चंद्राकार वाहे निर्मला इंद्रायणी
साजिरे ते रूप त्याचे रेखुनी ठेवी मनीं
मंद डोले वृक्षमाला सूर छेडी कोकिळा – २

आवडीने भाविकांनी बालमुनिला वंदिता
दंग सिद्धोपंत होती कौतुकें त्या पाहता
"कोण कुठला बालका तू ?" प्रश्न केला त्याजला –३

"एक साधा तापसी मी बोलिले त्या विठ्ठलें
पैठणाच्या सन्निधी ते गाव माझे सानुले
तीर्थयात्रा करित आलो पुण्यदायी या स्थळा !" –४

भोजनाला नेत त्याला पंत आनंदें घरीं
धोरणी भार्या उमा ती बेत योजी अंतरीं
'छान आहे नोवरा हा आपुल्या मीनाक्षिला !' – ५

रंगवल्ली रेखिता ती मुग्ध बाला अंगणीं
पाहुणा तो गोड हासे तीही पाहे लाजुनी
दैव गुंफी सूक्ष्म धागा जीव भोळा गुंतला – ६

त्यास कन्या द्यावया ती होत पंतां प्रेरणा
विठ्ठला स्वप्नीं पहाटे येत दैवी सूचना
गाठ हो बोला-फुलाची योग नामी साधिला – ७

साक्षिने सिद्धेश्वराच्या सोनियाच्या त्या क्षणीं
सद्‌गुणी ती होत मीना विठ्ठलाची रुक्मिणी
रत्न भेटे कांचना ते गोड झाला सोहळा ! – ८

○ ● ○

# ५ रंगले न संसारीं त्या

निवेदन:– विठ्ठलाचा मूळ पिंडच विरागी वृत्तीचा असल्याने त्याला संसारात गोडी वाटेना. त्याच्या मनातला 'यात्रेकरू' पुन्हा जागा झाला. पंढरीच्या श्री विठूरायाचे दर्शन घेऊन त्याने रामेश्वराची यात्राही पुरी केली. त्यानंतर तो आपल्या मूळच्या गावी सहकुटुंब जाऊन राहिला. परंतु आईवडिलांचा मृत्यु आणि ग्रहदशेचा फेरा,-यामुळे त्याच्या प्रपंचाची घडी मोडून गेली. तो खिन्न मनाने पत्नीसह पुन्हा आळंदीस परत आला.

संन्यास घेण्याची प्रबळ इच्छा विठ्ठलाच्या मनात निर्माण झाली. परंतु पुत्रसंतान नसल्याने त्याला पत्नीची परवानगी मिळणे शक्य दिसेना. मात्र एक सिद्ध पुरुष त्याला सांगे की, "तूं येथे गुंतून राहू नकोस. तुझे जीवन कार्य वेगळे आहे. तू सत्वर काशीला जा !"

रंगले न संसारीं त्या चित्त विठ्ठलाचे
- चित्र उभे डोळ्यापुढती वेगळ्या जगाचे ।।धृ०।।

मार्ग धरी पंढरिचा तो वारकरी झाला
ध्यान विटेवरचे सुंदर साठवीत डोळां
‘रामकृष्ण हरि’ या गजरीं कीर्तनात नाचे – १

होउनि तो यात्रिक फिरुनी निघे प्रवासाला
पुण्यधाम रामेश्वरच्या घेत दर्शनाला
स्नान घडे सेतूबंधीं तिन्ही सागरांचे – २

भेटण्यास मातापितरां जात जन्मगावा
कठिण काळ आला भारी क्लेश होत जीवा
कुटिल दैव नेत हिरावुनि सर्वस्वच त्याचे – ३

पत्निसवे आळंदीला परत पुन्हा आला
होत खिन्न, सुख वाटेना कशातही त्याला
एकान्तीं चिंतन करि तो स्वहित-साधनाचे – ४

म्हणे, व्यर्थ जीवन झाले मूलबाळ नाही
भ्रामक या मायामोहीं अर्थ नसे कांही
त्यास जणू लांछन भासे लग्नबंधनाचे – ५

रुक्मिणीस वदला, “माझ्या शांति ना मनाला
संमती मला दे आता यती व्हावयाला
तीच खरी कांता प्रिय जी साधिते पतीचे !” – ६

ती सुमती विनवी, “नाथा, नका असे बोलू
कशी जगू तुमच्याविण मी घाव कसे झेलू ?
शास्त्रमान्य नच हे तुमचे वेड विरक्तीचे” – ७

सिद्ध कुणी परि त्या सांगे, “येथुनी त्वरें जा !
वाट तुझी गंगातीरा बघत गुरूराजा
भेटुनि त्या पूर्ण करी तू ध्येय अन्तरींचे” – ८

# ६ निघाला विठ्ठल काशीला

**निवेदन**:- सिद्धपुरुषाचा आदेश मानून विठ्ठलपंतांनी गृहत्यागाचा मनात निश्चय केला. त्यासाठी योग्य संधीची ते वाट पहात राहिले. एके दिवशी पहाटे त्यांनी तो क्षण साधला. काखेत धोतरपंचा घेऊन आणि 'गंगास्नानाला जातो', असे पत्नीला सांगून ते घरातून बाहेर पडले आणि थेट काशीला निघून गेले.

त्यांच्यासारख्या शहाण्या माणसाने आपल्या प्रमळ बायकोला असे फसवणे बरोबर आहे का ! श्रीराम आणि नळराजा यांनाही असाच संभ्रम झाला होता. कारण दैवगतीचा फेरा अगम्य असतो हेच खरे ! आपल्या सद्‌गुरूंची भेट घेण्यासाठी विठ्ठलपंतांनी अशा प्रकारे काशीचा मार्ग धरला !

अंधारातुनि प्रकाश दिसता धीर मना आला
निघाला विठ्ठल काशीला ।।धृ०।।

सर्व रात्र तो करित विचारा
नभीं उगवता पहाट तारा
दिव्याकृति कुणि देत इषारा
"सावधान हो, सत्वर आता साधी स्वहिताला" – १

डाकावुनि तो ओटीवरुनी
पुकारीत 'मी जातो' म्हणुनी
'हूं' वदली तशि सहज रुक्मिणी
वाटे तिजला पती चालला गंगास्नानाला" – २

ऐकुनि 'जा' हा शब्द सखीचा
इष्ट अर्थ तो घेई त्याचा
रुकार पडल्या जणू फळाचा !
बंधमुक्त तो होत विहंगम घेत भरारीला – ३

गृह–त्यागाचा मानस अपुला
मान्य कदा नच अर्धांगीला
ज्ञात असुनि त्या धर्मज्ञाला
ठेवुनि यापरि अंधारीं तिज जोगी तो बनला – ४

जगीं स्वर्णमृग कधी जन्मला ?
ज्ञानी रामहि मोहित झाला
तसाच येथे प्रकार घडला
पहा, गुंगवी कशी मानवा अगम्य विधिलीला – ५

ग्रंथान्तरिंही मिळे दाखला
निद्राकुल त्या दमयंतीला
नळराजा वनिं सोडुनि गेला
काळगतीचा अघटित फेरा चुके न कवणाला ! – ६

जगावेगळी त्याची तळमळ
जाणुनि इंद्रायणि हो व्याकुळ
ढाळित अश्रू सुवर्ण पिंपळ
आळंदीचा परिसर अवघा दुःखें डळमळला – ७

धरिली उत्तर दिशा तयाने
तीर्थक्षेत्रीं करुनी स्नाने
साधु-मुनींची घेत दर्शने
लंघुनि पर्वत–वने पातला त्वरे प्रयागाला – ८

बघता सुंदर त्रिवेणि संगम
श्रमासवें तो नुरला संभ्रम
माघ सोहळा साधुनि अनुपम
आला पावन वाराणशिला, जीव सुखें रमला – ९

स्नान त्रिकाळी भागीरथिचे
भिक्षान्नहि ते एकवेळेचे
अखंड चिंतन आत्मस्थितिचे
पूर्ण विरागी भाव तयाचा नित्यक्रम ठरला – १०

नमिता शिर विश्वेश्वर–चरणीं
सिद्धेश्वर तो दिसे लोचनीं
मनीं अचानक उभी रुक्मिणी !
पूर्वस्मृतिच्या भोवऱ्यात तो सैरभैर झाला – ११

हटयोगी तो होत निग्रहीं
पुरश्चरण करि सरित्प्रवाहीं
विलसे आत्मिक तेज प्रत्यहीं
होत दंग जनवृंद पाहता उग्र तपस्येला – १२

तटीं उभा कुणि सिद्ध अलौकिक
बघत विठ्ठलाकडे सकौतुक
दृष्टिभेट ती घडता सूचक
हाच खरा सद्‌गुरु आपुला जाणिव हो त्याला – १३

● ○ ●

## ७ द्या मला अनुग्रह गुरुदेवा !

**निवेदन :–** स्वामी रामानंदांना आपले गुरु करून घेण्याची अंत:प्रेरणा विठ्ठलास झाली. त्यांना पाहून काशीस आल्याचे त्याला खरे समाधान वाटले त्यांची भेट घेऊन आपले मनोगत विठ्ठलाने त्यांना सांगितले. तो म्हणाला, " स्वामीजी, आत्मस्वरूपाची ओळख करून घेण्याची मला विलक्षण तळमळ लागली आहे. मला या जगाचा कसलाच मोह पाश नाही. याकरिता मला संन्यासदीक्षा देऊन माझा उद्धार करा ! " (मात्र आपण विवाहित असल्याचे त्याने झाकून ठेवले.)

विठ्ठलाचा सात्विक भाव आणि शुद्ध आचार पाहून रामानंदांनी त्याला आपले शिष्यपद दिले आणि त्याचे नाव 'चैतन्याश्रम' ठेवले. पण यातूनच पुढे मोठी गुंतागुंत निर्माण झाली. यालाच विधिघटना किंवा नियतीचा खेळ म्हणतात !

द्या मला अनुग्रह गुरुदेवा !
व्हा प्रसन्न मजवरि कृपाळुवा ।।धृ.।।

म्हणती 'विठ्ठल' या देहाला
ममत्व त्याचे मुळी न मजला
इहलोकींचा पाशहि नुरला
तवपदीं समर्पित सर्वस्वा ।।१।।

वावटळीतिल पर्णापरि मी
शिणलो भ्रमता बहुविध धामीं
पुण्याश्रम हा पाहुनि स्वामी !
ये खिन्न मनाला धीर नवा ।।२।।

'ब्रह्म सत्य अन् जग मिथ्या' हे
तत्व मुखोद्गत मजसी आहे
मर्म खरे परि अगम्य राहे
तुमच्यासम ज्ञाता त्यास हवा ।।३।।

'विश्व आणि मी' यात कोणते,
गुप्त असे ते सांगा नाते !
उघडुनि माझ्या मनश्चक्षुतें
त्या मूळघराचा पथ दावा ।।४।।

'ज्ञानात् मुक्ति :' प्रसिद्ध ही श्रुति
संन्यासचि हे साधन त्याप्रति
दीक्षा आपण देउनि मज ती
चेतवा अन्तरीं ज्ञानदिवा ।।५।।

थोर तुम्ही सर्वज्ञ मुनीश्वर
दीनोद्धरणीं दक्ष निरंतर
शिरीं माझिया ठेवुनि शुभ कर
न्या पैलपार या आर्त जिवा – ६

निर्मळ त्याचा भाव जाणुनी
नाम त्यास 'चैतन्य' देउनी
सद्गुरुंनी त्या अमृतवचनीं
आत्मबोध कथिला तो बरवा – ६

"ब्रह्मरूप हे अवघे त्रिभुवन
अंश तयाचा तूहि चिरंतन
मीपण गळता तुटेल बंधन
तुज मिळेल शाश्वत सुख ठेवा – ८

अलिप्त राहुनी फुलवित तीरां
बघ, ही गंगा जात सागरा !
ठेव तिच्यासम तव आचारा
तू जाशिल तरुनी सहज भवा !"–९

जन भवतीचे नवल पाहती
स्वानंदीं गुरु - शिष्य रंगती
त्यांस हसे कशि अबोल नियती !
गूढार्थ कुणा तो नच ठावा –१०

○ ● ○

## ८ अंगणीं खिन्न उभी रुक्मिणी

**निवेदन** – मुखाने गोड ओव्या म्हणत रुक्मिणी अंगणामध्ये सकाळी सडारांगोळी घालीत होती. त्या बिचारीला काय माहीत कीं, आपला नवरा गंगास्नानाला जातो म्हणून पार काशीला निघून गेला आहे. दुपार टळून गेली तरी त्याचा पत्ता नाही. वाट पाहून ती थकून गेली. 'मी जातो' या त्याच्या शब्दाचा खरा अर्थ तिच्या लक्षात आला आणि ती फार गांगरून गेली.

आपला पती संन्यासी झाला आणि आपला संसार संपला, या जाणिवेने रुक्मिणीला सारे जग शून्य झाले. निराशेच्या भरात तिने इंद्रायणीत उडी घेतली. एका यतीने तिला वाचविले आणि उपदेश केला. "आत्मघात करणे हे पातक आहे. भगवंतावर विश्वास ठेवून तूं हे दुःख सहन कर. तो तुझे कल्याण करील !"

अंगणीं खिन्न उभी रुक्मिणी
पाल चुकचुके मनीं, फडफडे उजवी कशि पापणी ।।धृ.।।
मंजुळ ओवी स्फुरता अधरीं
करित सडा संमार्जन दारीं
काजळली कशि दिशा सकाळीं बघे चकित लोचनीं – १

देवघरातिल दीप थरथरे
बाळकृष्ण का असा बावरे !
रुखरुख लागे तिच्या जिवाला सुचे न वेणीफणी - २

दुपार झाली तरी घराला
स्नान उरकुनी पती न आला
अधीर होउनि नदीकिनारीं पाहे टक लावुनी - ३

संसारीं या चित्त न त्याचे
वेड जडे त्या संन्यासाचे
'जातो मी' हा साद तयाचा दचके स्मरताक्षणीं - ४

सलता काटा त्या शंकेचा
व्याकुळ झाला प्राण सतीचा
येउनि भोवळ कोसळली ती विद्ध जशी पक्षिणी - ५

सावरली झणि मायपित्यांनी
शोकभरें ती गेली खचुनी
दुनिया सारी दिसे सुनी तिज अंतरता घरधनी - ६

चुकवुनि डोळा आप्तजनांचा
तीर गाठला इंद्रायणिचा
तिला वंदुनी तिने प्रवाहीं देह दिला झोकुनी - ७

सदय कुणी यति तिथे प्रगटला
तटीं सत्वरीं आणुनि तिजला
निराश हृदया तिच्या धीर तो देई मृदुभाषणीं - ८

"आत्मघात हा निंद्य मानिला
कर्मभोग तो कुणा न चुकला
अग्नीसंगें सुवर्ण उजळे, जाण मर्म हे मनीं"- ९

येत घोर वनवास कपाळीं
तरुणपणीं ती जोगिण बनली
विष दुःखाचे पचवित साध्वी श्रीहरिच्या चिंतनीं - १०



○●○

# ९ रुक्मिणी पतिचिंतनिं रंगली

निवेदन :- विठ्ठलपंत अचानक घरातून दूर निघून गेल्यामुळे रुक्मिणीवर मोठेच संकट कोसळले. ती बिचारी निराधार झाली. पतीविना तिला जगणे असह्य झाले. पतीचे मनात चिंतन करीत एकेक दिवस ती मोठ्या कष्टानें कंठू लागली. एके दिवशी प्रातःकाळी इंद्रायणीचे स्नान करून ती पिंपळाला प्रदक्षणा घालीत होती. तेथे पारावर बसलेल्या एका यतीने तिला 'पुत्रवती भव' असा आशीर्वाद दिला. पण त्यामुळे तिला आनंद न होता तिची मुद्रा जास्तच खिन्न झाली. ते पाहून तो यतीही मनात चमकला. त्या साध्वीचे दुःख त्याने अचूक ओळखले आणि प्रेमळ शब्दांनी तिचे सांत्वन केले. ज्ञानदेवांच्या जीवनचरित्रात ह्या प्रसंग फार महत्वाचा आहे !

इंद्रायणिचे स्नान करोनी कुंभहि भरुनी जळीं
जात घरा एकली रुक्मिणी पतिचिंतनिं रंगली ।।धृ.।।

पूर्वदिशेला नव अरुणाचा स्वर्णध्वज शोभला
पतिव्रतेच्या परी लोचनीं अंधारच दाटला
मंशिबाचा ह्या काच सरे कधि आच जिवा लागली – १

अर्ध्या डावावरी उठोनी जिवलग गेला कुठे ?
विरली सारी स्वप्ने सुंदर, ऊर विषादें फुटे
सुकली कोमल प्रीतीलतिका दारुण विरहानलीं – २

नजर बावरी तिची गुंतली सिद्धेश्वर–दर्शनीं
स्तब्ध समोरिल अश्वत्थाला कंप सुटे तत्क्षणी
मृदुपर्णांची सळसळ सुचवी तळमळ हृदयातली – ३

नामें रामानंद मुनी तो यात्रेला चालला
पवित्र तीर्थे पहात आला काशीहुनि त्या स्थळा
शांत मनें तो घेत विसावा अक्षय तरुच्या तळीं – ४

प्रदक्षिणा घालिता पिंपळा पडे तिच्या दृष्टिला
पारावरती सिद्ध कुणीतरि ध्यानमग्न बैसला
विनम्र भावें तिने तयाची पदकमले वंदिली – ५

नेत्र उघडता दिसे समोरी सुवासिनी ती जशी
'पुत्रवती भव!' आशीर्वच हे सहज वदे तापसी
अधोवदन ती उभी विरहिणी खिन्नपणें हासली – ६

विस्मय वाटूनि साधु पुसे तिज "येत हसू कां तुला?
क्षणात होशी खिन्न पुन्हा कशि, सांग मुली तू मला!"
तशी रोखुनी अश्रू नयनीं साध्वी हळु बोलली – ७

"कुलवंताची असे वधू मी अभागिनी हो खरी
नकळत मजला सोडुनि गेला भरतार माझा दुरी
सांगा स्वामी, होईल कैशी सार्थ गिरा आपुली?" – ८

श्रवणीं पडता प्रश्न तिचा तो संन्यासी चमकला
तिच्या व्यथेने व्याकुळ होता धीरें उद्गारला
"बोल कधीही फोल न माझा, न धरी शंका मुळी! –९

वृत्त सर्व ते अंतर्ज्ञानी योग्याने जाणिले
'या सुभगेला कष्टदशा ही आली माझ्यामुळे
हवी मिळाया तिला सुखाची ठेव तिची हरवली – १०

विरक्त मानुनि आपण ज्याला वेष यतीचा दिला
चैतन्याश्रम पती हिचा तो पट्टशिष्य आपुला
अयोग्य त्याची अशी विरक्ती आपणांस बाधली' –११

मायपित्यांना तिच्या मुनी तो देई आश्वासना
"तुमचा प्रिय जामात तुम्हांला भेटवीन मी पुन्हा
पुण्यशील ही तुमची कन्या धन्य होत भूतलीं" –१२

● ○ ●

# १० संथ वाहते गंगा

**निवेदन :**– आळंदीहून रामानंद स्वामी तसेच काशीला आपल्या आश्रमात परत आले. त्यांनी सिद्धोपंतांना आपल्याबरोबर घेतले होते. संन्यासी बनलेल्या विठ्ठलपंताची समस्या सोडविण्यात ते गुंग होऊन गेले. यात्रा अपुरी ठेवून गुरुजी अचानक माघारी आल्याचे पाहून विठ्ठल मनात चपापला. सिद्धोपंतही तेथे आलेले दिसताच एकूण प्रकार त्याने ओळखला. स्वामींना सत्यगोष्ट सांगून त्यांची क्षमा त्याने मागितली.

स्वामी त्याला म्हणाले, “धर्मपत्नीला दु:खी करून तुला संन्यासी होता येणार नाही. ही गोष्ट धर्मशास्त्राच्या विरुद्ध आहे. ‘प्रपंच हा परमार्थाचा वैरी आहे’ – ही कल्पना भ्रामक आहे. ईश्वराची भक्ति करून प्रापंचिक मनुष्याला आत्महित साधता येते. तू आळंदीस परत जा आणि सुखाने संसार कर. तुझे कल्याण होईल !” सद्‌गुरूंची आज्ञा विठ्ठलाने मान्य केली.

**नवलकथा ही सांगत जगता संथ वाहते गंगा**
**रात्रीं तीरावरी आश्रमीं एक महामुनि जागा ।।धृ.।।**

**काळोखातुनि प्रकाशपक्षी फुलवी सोनपिसारा**
**कुरवाळुनि हळु नवकलिकांना खुलवित शीतळ वारा**
**दिपवी नयनां दिव्य झळाळी विश्वेश्वर–कळसाची**
**बहरुनि आली बाग गुलाबी पूर्वक्षितिजावरची**
**हरितवर्ण तरुराजी मुरके मिरवित माणिकरंगा – १**

**पुण्यप्रवाहीं सहर्ष रमला अलोट यात्रिक मेळा**
**‘जय हर गंगे भागिरथी’ हा घोष दिगन्तीं घुमला**
**विश्वेशाच्या पूजाविधिचा भव्य सोहळा साजे**
**नानाविध वाद्यांच्या गजरीं काशी नगरी गाजे**
**माळ दिव्यांची देत मनोहर शोभा धवल तरंगा – २**

**परते विठ्ठल कार्य साधुनी स्नानादिक नित्याचे**
**रुद्रावर्तन करित मुखें परि चित्त नसे स्थिर त्याचे**
**ठेवुनि अपुरी यात्रा गुरुजी माघारी कां आले ?**
**पडले मोठे गूढ त्यास हे चिन्ह बरे ना दिसले**
**दंश करी हृदयास तयाच्या संशयरूपी भुंगा – ३**

निश्चल आसनिं बसे मुनीश्वर दिवस जरी वर आला
कोलाहल किति माजे भवती भान मुळी नच त्याला
भासे मुद्रा शांत तरी मन गवसे चिंता–जाळीं
आकाशहि ते निरभ्र असता मेघ डवरला भाळीं
विस्मित हो रवि अवलोकुनि त्या अपूर्व चिंतन–योगा – ४

दर्शनकांक्षी भाविकजन ते अधीर तिष्ठत दारीं
कुजबुजती हळुवार शिष्यगण होउनि शंकित भारी
स्तब्ध सर्व मठ तटस्थ गुरुही, होमहवन थंडावे
टकमक पाहे विठ्ठल, नकळे आज असे का व्हावे?
भांबावे तो या कोडयाचा उकलू जाता धागा – ५

रोखुनि भेदक दृष्टी त्याला सिद्धपुरुष तो वदला
"धरिला भगवा वेष तुवां हा दूषण झाला मजला
भल्या गृहस्था, संन्यासाचा नाहिस तू अधिकारी!"
दचके विठ्ठल त्याक्षणिं दिसता सिद्धोपंत समोरी
थिजली त्याची वाचा, खचली पायतळींची जागा – ६

"दुराग्रहें तूं चैतन्या, ही घेतलीस यतिदीक्षा
तुझ्या निरागस धर्मपत्निला घोर ठरे ती शिक्षा
निर्मळ हेतू जरी तुझा तो निषिद्ध शास्त्रें गणिला!"
"अज्ञ असे मी क्षमा करा हो!" विठ्ठल विनवी गुरुला
अशा प्रसंगी कसा वागु मी कृपा करोनी सांगा" – ७

शांतवुनी त्या म्हणती स्वामी, "परत सुखें जा सदना
स्मरुनी प्रभुला मनीं यथोचित करी स्वधर्माचरणा
'प्रपंच बाधक नच परमार्था'– बोल सत्य हा मानी!"
गुर्वाज्ञा ती ऐकुनि विठ्ठल ठेवित माथा चरणीं
श्वशुरासंगें धरी पुन्हा तो आळंदीच्या मार्गा – ८

# ११ आली वटपौर्णिमा

**निवेदन :–** भगवंतावर दृढ श्रद्धा ठेवून रुक्मिणीने बारा वर्षे पती–विरह सहन केला. एकाद्या योगिनीप्रमाणे ती साध्वी स्त्री व्रतस्थ राहिली. देवाने तिची हाक ऐकली. तो मंगल दिवस वटपौर्णिमेचा होता. पहाटे स्नान करून रुक्मिणीने श्रीसिद्धेश्वराचे दर्शन घेतले आणि शुद्ध मनाने वटपूजा करून आपल्या व्रताची सांगता केली.

तिच्या अंतर्मनाला एक गोड हुरहुर लागून राहिली. पतीचरणांची चाहूल घेण्यात तिचे सारे लक्ष गुंतले. त्या तन्मय अवस्थेत ती तुळशी वृंदावनाजवळ बसून राहिली. मावळतीच्या धूसर प्रकाशात एक अस्पष्ट आकृती तिच्यासमोर हलकेच प्रकट झाली वर मान उचलून पाहताच तिचे भान हरपले. दुरावलेली दोन मने पुन्हा एक झाली. ती प्रेमभेट अपूर्व होती !

शुभवार्ता घेउनि आली वटपौर्णिमा
रुक्मिणिचा निर्मळ शोभे मुखचंद्रमा ।।धृ.।।

तिज आशीर्वच त्या सिद्धाचे आठवे
अन्तरीं सुकोमल आशांकुर पालवे
जीवनीं सतीच्या भाग्यपर्व ये नवे
घनतमीं विराजे शुक्रकला अनुपमा – १

सुस्नात होउनी व्रतस्थ ती भामिनी
रंगली रेखिता रांगोळी अंगणीं
अरुणास न्याहळी मुग्ध उषा लाजुनी
झळकला तिच्याही गालावर लालिमा – २

सारवुनी चुलिला अग्नि तिने फुलविला
ज्योतिने सुमंगल देव्हारा उजळला
लडिवाळ रांगता बाळकृष्ण हासला
कपिलेच्या 'हम्मा' स्वरें दंग ती रमा – ३

ती म्हणे सख्यांना, "ऐकुनि वेणूध्वनी
झणि चला बघूया यमुनेच्या दर्पणीं
सत्वाचे कुंकू निजभाळीं रेखुनी
भक्तिने करू वटपूजा जिंकू यमा!" – ४

'सुखरूप असो पति!' सिद्धेश्वर प्राथिला
आदरें घातली प्रदक्षिणा पिंपळा
वटवृक्ष तिने मग यथासांग पूजिला
सांगता व्रताची तिच्या निवारी श्रमा – ५

एकली बसे ती निवांत वृंदावनीं
जणु तन्मय झाली तुळशी हरिचिंतनीं
नच भान तिला जरि आले सांजावुनी
गुज सांगे रविला रोमांचित पश्चिमा – ६

अंगणीं रेखिल्या सुरम्य कमलाकडे
टक लावुनि बघता ऊर तिचा धडधडे
हळुवार पाउलीं उभे कुणी ते पुढे!
मन तिचे त्याक्षणीं मधुर वरी संभ्रमा – ७

'थांबावे क्षणभर!' उठली तशि तेथुनी
घृतपात्र समोरी ठेवित ती आणुनी
मुख त्यात निरखिता खूण ठसे लोचनीं
ती सांज मनोहर घडवी मधुसंगमा – ८

फुलबाग अंबरीं रजनीचा बहरला
मृदु वचनीं विठ्ठल सुखवी प्रियपत्निला
ये अधिक गोडवा विरहाने प्रीतिला
चांदण्यात वसुधा भासे स्वर्गोपमा – ९

● ○ ●

# १२ उठले वादळ आळंदीला

निवेदन :– विठ्ठल काशीहून आळंदीस परत आला आणि सद्‌गुरूंनी सांगितल्याप्रमाणे रुक्मिणीबरोबर शांत मनाने संसार करू लागला. परंतु तेथील रूढिवादी शास्त्री-पंडितांनी त्याच्या विरुद्ध भयंकर काहूर उठविले. संन्याश्याला 'सार करता येत नाही ' – ' अशी शास्त्राज्ञा आहे. तिचा भंग विठ्ठलाने केला. म्हणून आळंदीत भयानक वादळ माजले. त्यामुळे विठ्ठल आणि रुक्मिणीला तेथे जगणे केवळ अशक्य झाले. तथापि विठ्ठल मोठा सुविचारी होता. चिंताकुल रुक्मिणीला धीर देऊन तो म्हणाला, " समाज आपला शत्रु बनला आहे. तथापि मनुष्यातल्या माणुसकीवर माझा विश्वास आहे. ती आपणांस अंतर देणार नाही. तिचा एकवार कानोसा घेऊन पुढे काय करायचे ते आपण ठरवू !"

उठले वादळ आळंदीला !
काय पुढे होणार कळेना, जो तो भिउनी गेला ।।धृ।।

एक भला द्विज मुंडन करुनी
धरित जानवे-शेंडी फिरुनी
पत्नीसह तो नांदे सदनीं
अनाचार किति घोर पहा करि, डांगोरा हा पिटला – १

पोथिनिष्ठ ते शास्त्री–पंडित
गहजब करिती क्रोधें धुमसत
निंद्य कर्म हे घडले निश्चित
कली मातला भूमितलावर अवघा धर्म बुडाला ! – २

' संन्याश्याला पुन्हा कधीही
गृहस्थाश्रमीं प्रवेश नाही ! '
बळें मोडुनी रूढनीति ही
विठ्ठल दोषी ठरला म्हणुनीं जाति-बहिष्कृत केला – ३

पाहुनि जन त्या फिरवित माना
कुणी न त्याशी करी भाषणा
होत मनाई देवदर्शना
घाव जिव्हारीं लागे त्याला कुठेहि थारा नुरला – ४

जामाताचे गृहीं पदार्पण
श्वशुराला ते झाले लांछन
धार्मिक विधिला मिळे न ब्राह्मण
आप्तबंधुगण दूर पांगला प्रसंग दुर्धर आला – ५

रुक्मिणिची कशि सुकली चर्या !
तिला हिणविती आयाबाया
होत यातना कोमल हृदया
अश्रु तिच्या नयनातिल पुसता विठ्ठल व्याकुळ झाला – ६

वज्र तळपते लटकत माथीं
चरणतळीं थरकापे धरती
भेसुर आकृति खिदळत भवती
घालित विळखा काळरात्र त्या सुशील दांपत्याला – ७

पडे विठ्ठला विचार मोठा
घन तिमिराने गिळल्या वाटा
देती धडका तुफान लाटा
कशी आपुली बुबळी नौका जाईल पैलतिराला ! – ८

म्हणे सुजन तो खिन्न सखीला
"वैरी जरि हा समाज बनला
मानित मी तरि माणुसकीला
बघू एकदा कौल लावुनी मनुजातिल देवाला !" – ९

● ○ ●

# १३ माणूस म्हणोनी जगू द्या मला !

निवेदन :– ' संन्यासी झालेला विठ्ठलपंत पुन्हा संसारी बनला, ' म्हणून आळंदीच्या कर्मठ शास्त्रीपंडितांचा त्याच्यावर मोठा रोष झाला. त्यामुळे विठ्ठलपंतावर मोठा बिकट प्रसंग गुदरला. तेथील धर्मसभेपुढे त्याने आपली कैफीयत मांडली व आपल्यास शुद्ध करून घेण्याची नम्र बिनंती केली. तो धर्मधुरीणांना म्हणाला, "क्षमा हा धर्माचा मूलाधार आहे. एकवार मला क्षमा करून माणुसकीचा धर्म तुम्ही राखा. अहो, मीही तुमच्यासारखाच एक माणूस आहे. माझ्यावर कृपा करा अन् माणूस म्हणून मला जगू द्या !"

पण रूढीचे दडस कानात वाढलेल्या धर्ममार्तंडांना विठ्ठल पंताचा टाहो ऐकू गेला नाही. त्याला बहिष्कृत करून त्यांनी त्याची अवहेलना केली. तेव्हा त्यांना बाणेदारपणाने उत्तर देऊन त्याने जगावेगळे राहण्याचा निर्धार केला.

'माणूस म्हणोनी जगू द्या मला ! '
प्रार्थी विठ्ठल त्या ब्रह्मवृंदाला ।।धृ।।

भरे सभा सिद्धेश्वर-मंदिरीं
स्तब्ध चित्रापरी मंडळी सारी
बद्धांजली उभा विठ्ठल दारीं
गाभाऱ्यात त्याचा बोल घुमला – १

"भूदेव आधार तुम्ही विश्वाचे
थोर उपासक शब्द ब्रह्माचे
माझ्या शिरीं ठेवा छत्र कृपेचे
ग्रामण्याचा फास करा मोकळा – २

पंकोद्भव पद्म प्रिय देवाला
अव्हेरीना गंगा क्षुद्र ओहोळा
माय धरी पोटीं मलिन बाळा
तैसा तुम्ही मला माना आपुला !" – ३

महादेव शास्त्री अध्यक्ष-स्थानीं
महाजनांच्या त्या मता जाणुनी
निर्णय दिला कीं दिठ्ठला त्यांनी
"पात्र नाहीस तू प्रायश्चित्ताला – ४

संन्यासी तू होसी पुन्हा गृहस्थ
अश्लाघ्य तुझी ही कृती अत्यंत
स्वहस्तें केला त्वां स्वताचा घात
चालेना आमुचा उपाय त्याला – ५

अशा दुराचारें अधर्म वाढे
समाज-मूर्तीला जातील तडे
वर्णसंकराचा धोका ये पुढे
स्थान येथे नाही नीतिभ्रष्टाला"! – ६

सिद्धोपंत मनीं होउनी कष्टी
भाकिती करुणा जावयासाठी
लोटुनी त्यांनाही शोक-संकटीं
कर्मठ विप्रांनी नकार दिला – ७

विठ्ठल म्हणे त्या रूढीदासांना
"क्षमा ही धर्माची मुख्य प्रेरणा
तिने खरी शोभा लाभे जीवना
जाणीव ती परी नसे तुम्हांला – ८

पाजळुनी टेंभा दंभाचाराचा
साधिता दुःस्वास माणुसकीचा
जोगवा तुमच्या नको दयेचा
राहीन सुखें मी जगावेगळा!" – ९

# १४ इंद्रायणिच्या तटीं

निवेदन :- आळंदीच्या अहंमन्य महाजनांनी विठ्ठलपंतांची विनंती साफ धुडकावून लावली. ग्रामत्याग करण्याचा त्यांनी निश्चय केला. रुक्मिणीही तेव्हा आपल्या पतीबरोबर घराबाहेर पडली. तिच्या मात्यापित्यांना अतिशय दु:ख झाले. आपल्या आईकडून रुक्मिणीने पूजेसाठी फक्त 'बाळकृष्ण' तेवढा मागून घेतला. इंद्रायणीच्या काठावरील निर्जन सिद्ध बेटात एकपर्ण कुटी उभारली गेली. निसर्गाच्या संगतीत ते निर्वासित जोडपे शांतपणाने तेथे राहू लागले.

विठ्ठलपंत हे खरे आत्मज्ञानी होते. पण त्यांच्या मनाला एक शल्य सारखे बोचत होते. 'या जगात अनाथ जीवांची कशी कुत्तरओढ होते', याचा दाहक अनुभव त्यांनी स्वत: घेतला होता. 'समाजातले उच्चनीच भेद नष्ट व्हावेत, सर्वांना सुखाने नांदता यावे, माणुसकीची सदैव जपणूक व्हावी !' ही त्यांच्या अंतरीची खरी ओढ होती. पण अशी सुधारणा घडून येण्याला नवा लोकनायक हवा होता. मात्र तो प्रेमळ आईच्या हृदयाचा असावा ! देवाकडे हेच एक त्यांचे मागणे होते.

इंद्रायणिच्या तटीं
शोभली सुंदर पर्णकुटी ।।
विठ्ठल पत्नीसवे राहिला तपोवना-निकटीं ।।धृ.।।

सिद्धबेट ते निवांत पावन
एकदिलाने ती दोघेजण
तिथे कंठिती शांतपणें दिन
खेद न वाटे त्यांना जरि हो आप्तजनांची तुटी -१

झळकत माथीं भव्य निळे छत
हिरवाळीची रम्य बिछायत
वृक्षलतांची प्रेमळ सोबत
मंद समीरण श्रांत तनूला देत सुगंधी उटी -२

शुभ्र मोगरा फुले अंगणीं
ज्योत सुवर्णी तेवत कोनीं
गृह-कार्यी ती दक्ष रुक्मिणी
तिने पूजिला नवसाचा तो बाळकृष्ण संपुटीं - ३

सिद्धेश्वर-शिखराचे दर्शन
घडते तेथुन त्यांना निशिदिन
अश्वत्थाचे कळते स्पंदन
सांजसकाळी सांगे हितगुज स्नेहल छायानटी - ४

स्वार्थी दुनिया तोडुनि माया
दूर जरी त्या लोटित उभया
सृष्टिदेवता उदार हृदया
देउनि शीतल छाया त्यांना सांभाळित संकटीं -५

लाभे मधुघट जरी प्रीतिचा
खुपे न काटा शोकभयाचा
विजनवासही होत सुखाचा
अश्रूंमधुनी मधुर चांदणे फुलता निवते दिठी - ६

निजकष्टाचे अन्न सेवुनी
गुणी जोडपे वसे निर्जनीं
धीरें अपुले दुःख साहुनी
चित्र उद्याच्या सुखी जगाचे रेखत अंतःपटीं - ७

श्रीहरिचा करि विठ्ठल धावा
"क्षमाशील हा धर्म असावा
श्रेष्ठ-कनिष्ठही कुणी नसावा
जाव्या लोपुनि जीर्ण मतांच्या जाचक या चौकटी! -८

असे खरा जो हृदयें आई
लोकनाथ कधि जन्मा येई?
विशुद्ध जीवनप्रकाश देई
रक्षिल दुःखी माणुसकीला कंठीं घालुनि मिठी!" -९

# १५ धेनु घरीं आणावी हो !

**निवेदन :–** गावापासून अलग असलेल्या सिद्धबेटात विठ्ठलपंत आणि रुक्मिणी यांचा नवा संसार सुरू झाला. त्यांना प्राप्त परिस्थितीची पूर्ण जाणीव असून ती दोघेजण शांतवृत्तीने व संयमाने वागत. तथापि निसर्गाची स्वाभाविक प्रेरणा त्यांना रोखून धरता आली नाही आणि त्यात अस्वाभाविक असे कांहीच नव्हते ! निसर्ग नियमानुसार रुक्मिणीला दिवस गेले.

सकाळी रुक्मिणी अंगणात सडा घालीत होती. नदीवरून स्नान करून विठ्ठलपंत अंगणात आले. सलज्ज नजरेने त्यांच्याकडे पहात रुक्मिणी त्यांना म्हणाली, "आता एक गाय घरी आणायला हवी !" त्यातील गर्भित अर्थ लक्षात आल्यावर विठ्ठलपंतांच्या मुद्रेवर हसू उमटले. निवृत्तिनाथ, ज्ञानेश्वर, सोपानदेव आणि मुक्ता, ही चार बालके जगाच्या कल्याणासाठी आळंदीत अवतीर्ण झाली.

धेनु घरीं आणावी हो, सांगे रुक्मिणी पतीला
स्निग्ध वाणी ती ऐकुनी वाटे नवल विठ्ठला ।।धृ.।।

पाहे पुन्हा पत्नीकडे
पडे त्याला नवे कोडे
लवे लाजाळूची वेली
हास्यकळी खुले गालीं
अन्तरींच्या आनंदाने दिला हुंकार कोवळा – १

जसा पोटीं गर्भ वाढे
दिव्य कांती देहा चढे
सर्वांविषयीं जगीं या
तिच्या उरीं दाटे माया
निवे दिठी विठ्ठलाची तपश्चर्या आली फळा – २

झोपडी ती चंद्रमौळी
भाग्य विश्वाचे उजळी
थोर सतीच्या चरणीं
येत लक्ष्मी लोटांगणीं
म्हणे जगन्नाथ मनीं 'अशी आई हवी मला!' –३

माघातल्या माधुरीने
मोहरली रानेवने
मंद वारा पहाटेचा
धरी ताल ओंकाराचा
पुण्यदायी सूर्योदयीं ज्येष्ठ निवृत्ती जन्मला – ४

दोन वर्षांनी त्यापुढे
श्रावणाचा डंका झडे
मध्यरात्रीं अंधाराला
फुटे प्रकाशाचा डोळा
कृष्णजन्माचा क्षण तो ज्ञानदेवाने साधिला – ५

भरे कार्तिकाची शोभा
नभामाजी भानु उभा
रखुमाईच्या कुशीला
बाळ सोपान शोभला
अश्विनाच्या शुभारंभीं मुख दावी मुक्ताबाला – ६

लेकुरे ही जणू हिरे
ब्रह्ममूर्ती संत खरे!
लोककल्याणाची चिंता
जडे रात्रंदिन चित्ता
तिन्ही देवांसवे आली आदिमाया आळंदीला – ७

● ○ ●

# १६ रंगला संसार संन्याश्याचा

निवेदन :- 'मातृत्वाची आस' स्त्रीच्या मनाला निसर्गतःच लागलेली असते. 'आई' या दोन अक्षरात तिच्या जन्माचे साफल्य सामावलेले असते. 'निपुत्रिकाला मोक्ष नाही' - अशी धार्मिक कल्पना आहे. परंतु पतीच्या संन्यास-ग्रहणाने रुक्मिणी निराश झाली. पुढे गुर्वाज्ञेवरून विठ्ठलपंत गृहस्थाश्रमी झाले आणि तिच्या मनातली 'आई' अंगाई गीत आळवू लागली. रामानंद यतींच्य आशीर्वादाने आणि भगवंताच्या कृपेने रुक्मिणीला रत्नासारखी चार लेकरे झाली 'ब्रह्ममूर्ती संत जगीं अवतरले ! उद्धराया आले दीन जनां' - असे गौरवाचे उद्‌गार संत नामदेवांनी त्यांच्याबद्दल काढले आहेत.

विठ्ठलपंत आणि रुक्मिणी या उभयतांना त्या बालकांच्या बोबड्या बोलांनी आणि गोड लीलांनी आकाश ठेंगणे झाले. परंतु त्यांच्या सभोवरचे जग आपल्याच धुंदीत दंग होते. त्यातील कांही खुनशी हात विठ्ठलपंतांची पारख करायला टपलेले होते. विठ्ठलपंतांना या गोष्टीचा फार खेद झाला.

ईश्वरी कृपेचा लाभता आधार
रंगला संसार संन्याश्याचा ।।धृ.।।

सिद्धपुरुषाची होत खरी वाणी
अन्तरीं रुक्मिणी आनंदली
द्वारीं नवसाचा फुलला मोगरा
गंध नेत वारा दाही दिशा
रुक्ष जीवनाला चढे स्वर्णकांती
आसवांचे मोती झाले छान !
बहुदिवसांचे स्वप्न हो साकार
हारपला भार यातनांचा ।।१।।

सूर्यचंद्रापरी तेजस्वी ती बाळे
लोभावती डोळे त्रैलोक्याचे

द्राक्षाहुनी त्यांचे रसाळ ते बोल
येत जिवा डोल धन्यतेचा
वनदेवी त्यांना घाली बाळलेणी
गात इंद्रायणी गोड गाणी
मिळे मायबापा अमृताचा घडा
अंगणात सडा चांदण्याचा ।।२।।

चारी बालकांच्या किती रम्य लीला !
विरागी विठ्ठला गुंगविती
सानुल्या हातांची पडे गळा मिठी
साखरेची वाटी भिडे ओठां
प्रेमें रखुमाई दृष्ट काढी त्यांची
दुलई मायेची घाली त्यांना
झोपडीत शोभे चैतन्याचा दिवा
सापडला ठेवा संतोषाचा ।।३।।

सिद्धबेटी नांदे स्वर्ग आनंदाचा
दुर्जनासी त्याचा द्वेष वाटे
आली कामधेनू अभाग्याच्या घरा
घालवी माघारा तिला कैसा !
न ये कोणा मुखीं कौतुकाचा सूर
दुखावला ऊर विठ्ठलाचा
वैशाख वणवा घालीत विळखा
पांडुरंग सखा अनाथांचा ।।४।।

● ○ ●

22513

# १७ देवाघरच्या सुंदर ज्योती

निवेदन :- ज्ञानेश्वरादि चारी भावंडांना जन्मापासूनच दारुण वनवास सोसावा लागला. जगाचे कल्याण करणाऱ्या सज्जनांचा जगात जास्त छळ होतो, असा आजवरचा इतिहास आहे. कंटकांच्या वाटेला कोणी जात नाही, परंतु सुकुमार फुलांना खुशाल पायदळी तुडविले जाते ! विठ्ठलपंत आणि रुक्मिणी यांच्या चारी गुणी लेकरांची हीच हृदयस्पर्शी कहाणी आहे. कोणत्या कठीण अवस्थेत त्यांचा जन्म झाला, लहानपणी त्यांचे कोडकौतुक कोणी केले असेल आणि त्यांची प्रेमाने वास्तपूस्त करणारे त्यांना कोणी भेटले असेल का ? हा प्रश्न मनात येतो.

सभोवार सारी आग भडकली असताना ही चारी चिमणी पाखरे निर्जन रानात वाढली. त्यांचे परोपकारी मातापिता त्यांना उपदेश करीत, " बाळांनो, हे जग तुमच्याश कसेही वागो, तुम्ही मात्र जगाला सदैव प्रेमच द्या ! 'आई' हे ज्ञानेश्वरांचे खरे दैवत होते. अनाथ माणुसकीचे रक्षण करण्याची प्रेरणा आईपासून त्यांनी घेतली.

देवाघरच्या सुंदर ज्योती
गोजिरवाणीं चार मुले ती ।।धृ.।।

कसे बाळपण त्यांचे गेले !
न्हाऊ माखू कुणी घातले ?
लाड कोण पुरवीत आवडी
नोंद कुठे ती नाही जगतीं – १

न्याय येथला आहे उलटा
रत्नमोल नच कळे मर्कटा
ढोंगी दुनिया भजे फत्तरां
तुडवित पायीं फुले उमलती – २

गावाने जरि दावा धरिला
पर्वा त्याची नसे विठ्ठला
जतन करी त्या सान अंकुरां
पेटत अवघे रान भोवती – ३

घेउनि त्यांना अपुल्या जवळी
घास मुरवीं तो प्रेमें घाली
बघे रुक्मिणी किती कौतुकें
नकळत नयनीं आसूं झरती – ४

धरटयामधली पिले चिमुकली
झेप हळू जशि घेती खाली
गुरकावित त्या रागिट मुद्रा
खडे मारिती कुणी हिणविती – ५

म्लान तयांच्या पाहुनि वदनां
मातेला किति होत वेदना!
कुरवाळुनि त्यां हृदयीं धरिला
तिच्यासवें तरुलता स्फुंदती – ६

नीतिपाठ त्यां शिकवी विठ्ठल
"होवो तुमचे मन गंगाजल
सर्व जगाला प्रेम तुम्ही द्या
हासत झेलुनि प्रहार माथीं – ७

म्हणे तयांना माय रुक्मिणी
"ठेवा निर्मल कृती नि वाणी
जपा निरंतर माणुसकोला
सुजनपणाची वानीत महती" – ८

दैवत 'आई' ज्ञानेशाचे
तेच खरे सुखनिधान त्याचे
धरतीचा या स्वर्ग कराया
तिजपासुनि तो मिळवी स्फूर्ती – ९

# १८ घडावा तीर्थक्षेत्रीं वास !

**निवेदन :-** जनसंमर्दापासून दूर अशा निर्जन सिद्धबेटात विठ्ठलपंतांनी आपला प्रपंच थाटला. तरी त्यांच्या मागची जनंनिंदेची साडेसाती कांही सुटली नाही. सज्जनांची छळणूक करण्यात दुष्टदुर्जनांना आसुरी आनंद होतो. विठ्ठलपंताना त्याचा पदोपदी अनुभव आला. तेथे जगणे त्यांना अशक्य झाले. शेवटी नाइलाजाने बायको व मुले यांना बरोबर घेऊन ते तीर्थयात्रेस निघाले. निसर्गाच्या सहवासात पवित्र तीर्थस्थळांचे दर्शन घेताना त्यांना फार समाधान वाटले.

ज्ञानेश्वर मोठे धोरणी आणि दूर दृष्टीचे होते. या तीर्थाटनात त्यांना लोकस्थितीचे खरे स्वरूप दिसून आले. समाजातल्या उपेक्षित अन् दलित जनतेच्या अंतरीचे कढ त्यांच्या हृदयाला जाऊन भिडले. लोकोद्धाराची प्रेरणा त्यांना मिळाली.

त्र्यंबकेश्वर क्षेत्रात निवृत्तीनाथांना महान्योगी श्रीगनीहिनाथ यांचा गुरूपदेश मिळण्याचा सुयोग अचानक आला. ज्ञानेश्वरांच्याही जीवनचरित्रात या प्रसंगाला विशेष महत्व आहे.

ध्यास जडे विठ्ठला घडावा तीर्थक्षेत्रीं वास
कुटिल जगाचा होत जिवाला असह्य सासुरवास ।।धृ।

घेउनि पत्नीसवे मुलांना
गात सुखाने हरिगुणगाना
भल्या पहाटे करी प्रयाणा
पडता मागे गाव सोडिला सुटकेचा निःश्वास – १

विशाल मंडप नील नभाचा
खुले गालिचा मखमालीचा
फुले मोगरा प्रसन्नतेचा
वनराणीची मंजुळ वीणा देत मना उल्हास – २

विलसे सुंदर निसर्ग–शाळा
तेथिल सगळा थाट आगळा
खुल्या दिलाचा पाठ रंगला
सुखसंवादीं गुरु–शिष्यांचा साधित आत्मविकास – ३

ज्ञानेश्वर तो खरा धोरणी
रमे प्रवासी लोक-दर्शनीं
मिळवी अनुभव ज्ञान जीवनीं
ध्येय सिद्धिला पोषक झाले यात्रेचे षण्मास – ४

पहात देवस्थाने तारक
भीमाशंकर, अष्टविनायक
येत नाशिका साही यात्रिक
पंचवटी त्यां सांगत पावन रामाचा वनवास – ५

लक्ष गुंतले त्र्यंबकेश्वरीं
ब्रह्मगिरीला करिता फेरी
गर्जत भीषण व्याघ्र समोरी
विठ्ठल जाई दूर झडकरी घेउनि स्त्रीपुत्रांस – ६

निवृत्तीची होत चुकामुक
निबिड वनीं तो भ्रमता बालक
गुहेत एका शिरे अचानक
निमग्न ध्यानीं गहिनिनाथ ते दिसले तेथे त्यास – ७

शिवयोग्याने नेत्र उघडिला
सतेज बटु तो पुढे देखिला
गौरविले गुरु-मंत्रें त्याला
मायपित्यांची भेट जाहली सफळ मनाची आस – ८

● ○ ●

# १९ मानव हा आहे वैरी

**निवेदन :-** पवित्र तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी वास्तव्य करून विठ्ठलपंत आपल्या परिवारासह आळंदीस परत आले. श्रेष्ठ योगी श्रीगहिनीनाथ यांचा गुरूपदेश आपल्या ज्येष्ठ चिरंजीवाला मिळाला, याचे त्यांना फार समाधान वाटले. भरल्या अंत:करणाने ते आपल्या पर्णकुटीसमोर आले अन् त्यांच्या साऱ्या आनंदावर विरजण पडले. मोठ्या कष्टाने त्यांनी त्या निर्जन जागेत उभारलेले सुंदर घरकुल, त्याच्या सभोवार प्रेमाने जोपासलेली हसरी फुलझाडे आणि त्यांच्या इतर आवडत्या वस्तू यांचा तेथील दुष्ट ग्रामकंटकांनी पार विध्वंस करून टाकला होता !

ते दु:खदायक दृश्य पाहून विठ्ठलपंतांच्या मुखातून अचानक उद्‌गार निघाले, " माणसाचा खरा वैरी माणूसच आहे ! " देव, दैव, परिस्थिती आणि नियती मनुष्याच्या दु:खाला कारणीभूत आहेत, असे म्हटले जाते. परंतु त्या सर्वांपेक्षा ' मानवाच्या दुर्गतीला मुख्य कारण मानव आहे ' - ही गोष्ट लक्षात घेणे अवश्य आहे !

रुक्मिणीस विठ्ठल सांगे बोल अनुभवाचा
मानव हा आहे वैरी खरा मानवाचा ।।धृ.।।

किति विशाल सुंदर जग हे निर्मिले प्रभूने !
मलिन करी मनुज परी त्या पाशवी कृतीने
स्वार्थ - विषें दूषित झाला कुंभ अमृताचा - १

सौख्यभोग धनिकांचे अन् कष्ट गरीबांचे
विषमतेत विश्वातिल या बीज अनर्थांचे
मानवास बनवी राक्षस, माज मीपणाचा - २

जादु निसर्गाची रमवी मना सांजवेळी
जुळती कर स्वर्ग - धरेचे, भिन्नता निमाली
लाभ घडे समतामंत्रें सुखी जीवनाचा - ३

वदे पतीला ती साध्वी, "जडे एक चिंता
ज्ञानदेव - निवृत्तीची मुंज करा आता
संस्काराविण त्या निष्फळ जन्म हो मुलांचा ! - ४

'मुंज' शब्द ऐकुनि नाचे हर्षभरें मुक्ता
मुंडवळ्या बांधाया ती सजे ज्ञाननाथा
तिच्यासवे सोपानहि तो छंद घे मजेचा - ५

देत ना पुरोहित कोणी काढुनी मुहूर्ता
स्वजन कसे छळती त्याला नसे साह्यकर्ता
खेळ हो जगाचा जातो जीव दुर्बलांचा - ६

अशुभ गमे ग्रामस्थांना सावलीहि त्याची
होत जगीं गळचेपी कशि पहा सज्जनाची !
मार्ग त्यास एकचि उरला धर्म मंडळाचा ! - ७

○ ● ○

## २० प्रभो, हो नम्र तुला प्रार्थना

**निवेदन :-** विघ्नसंतोषी लोकांकडून विठ्ठलपंतांची होणारी विटंबना दिवसेंदिवस वाढत चालली. आळंदीच्या धर्मसभेने त्यांच्यावर बहिष्कार पुकारून त्यांच्या मुलांच्या मुंजी करण्यालाही त्यांना नकार दिला. आपल्यामुळे आपल्या गुणवान् बालकांचे सारे भवितव्य अंधारून जाईल, हे दुःख विठ्ठलपंतांना असह्य झाले. त्यांनी आपल्या पत्नीचा विचार घेऊन गंगेत देहत्याग करण्याचे ठरविले.

रात्र होऊन सभोवार सारी सामसूम झाली. विठ्ठलपंत आणि रुक्मिणीने मूक मनाने देवाला हात जोडले. गाढ झोपी गेलेल्या आपल्या चारी मुलांच्याकडे अश्रुपूर्ण नेत्रांनी एकवार पाहिले आणि श्वास रोखून तेथून पाऊल उचलले. त्यावेळी त्यांच्या जिवाची झालेली तडफड वर्णन करण्याला शब्द अपुरे पडतात. प्रयागक्षेत्री जाऊन गंगाप्रवाहात स्वतःचे देह लोटून देतांना त्या दोघांनी भगवंताची याप्रमाणे प्रार्थना केली.

दे ठाव पदीं तव शरणांगत या जना ।।धृ।।

तूं जादुगार दुनियेचा
दाविसी खेळ नवलाचा
भुलवीत जीव अवघ्यांचा
ठेविसी त्यातुनी अलिप्त तूं आपणां – १

योग्यांसहि दुर्लभ गमसी
जे भावें भजती तुजसी
तूं अंकित त्यांचा होसी
थोरवी तुझी ही गातो प्रेमें पुन्हा – २

गीतोक्त तुझ्या त्या मार्गे
पति-पत्नी आम्ही दोघे
संसार मांडिता संगे
हो विटंबना अशि दारुण, नच कल्पना ! – ३

शिव विष्णू ब्रह्मा माया
घेउनी मानवी काया
तोषविती अमुच्या हृदया
हे भाग्य आमुचे बघवेना दुर्जनां – ४

नियतीचा फासा उलटे
विस्कटले चिमणे घरटे
दुःखाने काळिज फाटे
त्या सान पिलांच्या तूचि करी रक्षणा – ५

मातला दैत्य दंभाचा
कंठ चिरी माणुसकीचा
वाली न कुणी गरिबांचा
येणार कधी तुज करुणा नारायणा – ६

सोडुनी मौन हे आता
घे धाव झणी भगवंता !
उद्धरी दीन ही जनता
आठवी तुझे ते ब्रीद पतितपावना ! – ७

द्विज आम्हां पापी म्हणती
देहान्त शासना देती
ती आज्ञा झेलुनि माथीं
या प्रयागक्षेत्रीं आलो तव दर्शना – ८

वंदुनी तीर्थराजाला
चिंतुनी मनीं घननोळा
तो दोघे एका वेळा
जय गंगे !' गर्जत करिती प्राणार्पणा – ९

● ○ ●

## २१ ज्ञानदेव जागा झाला

**निवेदन :–** रात्रीचा काळा पडदा दूर झाला. आभाळात शुक्राची चांदणी उगवली. ज्ञानेश्वरांना जाग आली. पण झोपडीत आईवडिलांची चाहूल त्यांना लागली नाही. त्या दोघांनी लोकांच्या छळाला कंटाळून स्वत:चे कांही बरेवाईट केले कीं काय, या शंकेने त्यांचे मन चरकले. तोंच 'आई' म्हणून छोटया मुक्ताने टाहो फोडला अन् सारा उलगडा झाला !

निवृत्तीनाथांना बरोबर घेऊन ज्ञानदेवांनी तेथील महाजनांच्याकडे आपले गाऱ्हाणे नेले. पण त्यांच्या पदरी निराशाच पडली. एका अतिशहाण्याने त्यांना हिणवून म्हटले, "तुम्ही प्रथम पैठणला जा अन् शुद्धीपत्र घेऊन या. मगच तुमच्या मुंजीला खरी मजा येईल !'

पहाट तारा नभीं उगवला
ज्ञानदेव जागा झाला ।।धृ.।।

आज कुटी कशि उदास वाटे !
पितृमुखातुनि स्तोत्र न उमटे
भूपाळी पण गात न आई
लागे चटका हृदयाला – १

रांगोळीविण रितेच अंगण
पक्षिगणांचे थांबे कूजन
स्तब्ध पवनही खिन्न तरुलता
अशुभाचा काटा रुतला – २

छोटी मुक्ता करिता तळमळ
योगिराज तो झाला व्याकुळ
कंठ दाटला निवृत्तीचा
शांतविता सोपानाला – ३

'चिरंजीव भव !' अक्षरपंक्ती
देवापुढली दावित ज्योती
अर्थ त्यातला स्पष्ट असे तो
शीतळ छायातरु ढळला ! – ४

होत अनावर दुःख मनाला
स्फुंदत वदला प्रिय दादाला
"मायतात व्हा तुम्हीच आता
सांभाळा हो आम्हांला !" – ५

प्रेमें त्याचे पुसता लोचन
निवृत्तीचे गहिवरले मन
काय गती यापुढे आपुली ?
यक्षप्रश्न हा धरित गळा – ६

ज्येष्ठ बंधुसह कर जोडुनि तो
नम्रपणें द्विजगणा विनवितो
"तुम्ही सुजन हो खरे दयाघन
द्या जीवन या सान मुलां – ७

प्रमाण मानुनि वचन आपुले
वडिलें प्रायश्चित्त घेतले
मान्य करा व्रतबंध आमुचा
जागुनि माणुस-धर्माला !" -८

येत न करुणा परी ब्राह्मणां
धिक्कारुनि ते म्हणती त्यांना
"हीन पशूहुनि तुम्ही पातकी
भ्रष्टविले या पुण्यस्थळा -९

लांछन तुमचे नरजातीला
जन्माआधी का नच मेला ?
नाही वर्णाश्रमीं स्थान या
संन्याश्याचा संततिला !" -१०

सुचवी हासुनि एक शहाणा
"शीघ्र चलावे तुम्ही पैठणा
शुद्धिपत्र जरि याल घेउनी
थाटाने करु मुंजीला" -११

● ○ ●

# २२ दीनवाणी चार बाळे

**निवेदन :-** ज्ञानदेवांच्या मातापितरांनी धर्मसभेच्या आदेशानुसार देहान्त प्रायश्चित्त घेतले. तरीही त्यांच्या चारी बालकांना समाजामध्ये आसरा मिळाला नाही. ज्ञानेश्वरांना हा अन्याय पहून झाला नाही. पैठणच्या धर्मपीठाकडून शुद्धीपत्र आणावे, असे निवृत्तीनाथांना वाटले. पण ज्ञानदेवांना मुंजीची आवश्यकता भागत नव्हती. निवृत्तीनाथ हे स्वधर्मनिष्ठ होते. "शास्त्र म्हणेल ते सांडावे, तें राज्यही तृण मानावे' - अशी त्याची श्रद्धा होती. धर्मबंधन सुटल्याने समाजात अनर्थ माजेल अन् लोकांना जगणे अशक्य होईल. म्हणून ज्ञानी माणसाने जनतेला योग्य मार्ग दाखविला पाहिजे." हे त्याचे म्हणणे ज्ञानेश्वरांना पटले.

पैठणास जाताना त्या निराधार चारी भावंडांना फार कष्ट झाले. परंतु वाटेत साध्याभोळ्या शेतकऱ्यांनी त्यांना प्रेमाने वागविले. त्यांच्यातली माणुसकी पाहून ज्ञानेश्वर संतुष्ट झाले, त्यांना नवी दृष्टी मिळाली !

पैठणाला चालली ती दीनवाणी चार बाळे
शैशवीं त्या सोनुल्यांच्या कष्ट भाळीं काय आले ! ।।धृ.।।

लाडक्या मुक्तास दादा घेत स्कंधीं आपुलीया
बाल सोपानास हातीं नेत धरुनी ज्ञानराया
आसवांची धार नेत्रां स्वेद - पूरें देह न्हाले - १

गर्द झाडी घेर घाली वैर साधी शैलमाला
संकटांची सज्ज सेना जागजागीं स्वागताला
जीव पोळे तीव्र तापें भूक - तानें कंठ वाळे - २

दैव मांडी क्रूर चेष्टा पोरक्या त्या लेकरांची
कोवळ्या पुष्पांवरी कीं हात वृष्टी इंगळांची
संस्कृतीच्या रक्षकांनी बंद केले कान डोळे - ३

सत्यधर्मा कोंडले त्या संधिसाधू दांभिकांनी
स्वार्थ हो स्वामी जगाचा, दुर्बलां दाता न कोणी !
शल्य ते झोंबे जिव्हारीं ज्ञानदेवा दुःख झाले - ४

प्रीतिने गोंजारुनी त्या शांत निवृत्ती म्हणाला
" क्लेशयात्रा भोगणे ही भाग आहे आपणांला
आगटीच्या काजळीने होत कां आकाश काळे ? - ५

शास्त्र मर्यादा सदा ही पाळुनीया ज्ञानवंतें
सावरोनी अज्ञ लोकां चालवावे नीट पंथें
जन्मलो या धर्मकार्या आठवी ते ब्रीद अपुले " - ६

सूज्ञ भावंडे अशी ती कंठिती धीरें प्रवासा
भाबडे खेडूत मार्गीं भेटुनी देती दिलासा
अमृताचे कवळ त्यांचे सेवुनी ज्ञानेश डोले ! - ७

भावना इंद्रायणीची जाणवे गोदावरीला
दर्शवीला त्या मुलांना थोर मातेचा जिव्हाळा
विश्वकल्याणार्थ त्यांना तेज वज्राचे मिळाले - ८

○ ● ○

# २३ न्याय द्यावा आम्हाला हो !

निवेदन :- पैठण क्षेत्रात आल्यावर तो चारी भावंडे तेथील धर्माध्यक्षांना भेटली. ज्ञानदेवांनी तेथे येण्यातील आपला उद्देश त्यांना सांगितला. सर्व पंडितांची आणि विद्वानांची मोठी सभा तेथे भरविण्यात आली. संन्याश्याची ती तेजस्वी मुले पाहून सारे पैठणकर दिपून गेले. पण त्यांच्या शुद्धीकरणाला शास्त्राधार मिळेना. मुख्य धर्माधिकारी त्यांना म्हणाले, " बाळांनो, तुम्हांला शुद्धीपत्र देता येत नाही. तुम्ही ब्रह्मचारी राहून ईश्वरचिंतनात काळ घालवा ! "

तेथे समोरच पखालीचा एक रेडा उभा होता. त्याच्याकडे बोट करुन एक निंदक ज्ञानदेवांना म्हणाला, " तुझ्याप्रमाणेच या रेड्याचे नाव 'ज्ञान्या' आहे. याच्या तोंडून वेद बोलवशील तर तुला आम्ही खरा ज्ञानी समजू आणि तुझा गौरव करू ! "

ज्ञानेश्वरांनी योगसामर्थ्याने रेड्याच्या मस्तकाला स्पर्श करताच तो मूक पशू वेदमंत्र म्हणू लागला. तो चमत्कार पाहून सारा ब्रह्मवृंद ज्ञानदेवांना शरण गेला. त्या चारी बालकांना ईश्वरी अवतार समजून पैठणकरांनी त्यांचा मोठा सत्कार केला. ज्ञानदेवांच्या अन् पांडुरंगाच्या जय जयकाराने दाही दिशा दुमदुमून गेल्या.

न्याय द्यावा आम्हांला हो, ज्ञानदेव सांगे सर्वां
गती काळाची जाणुनी ज्योत प्रेमाची जागवा ।।धृ.।।

पैठणाचे धर्मपीठ असे जगीं सुविख्यात
भरे धर्मज्ञांची सभा नागेशाच्या मंदिरात
केवल शास्त्री काशीचे वेदमूर्ती नामवंत
न्यायदेवते पुढे त्या चाले अपूर्व तो दावा – १

उभी चारी भावंडे तीं शांत मुद्रेने समोरी
हेटाळती त्यांना कसे द्विजाग्रणी अहंकारी
पाहुनी कीं निराधार सान पाखरे गोजिरी
परजोनी तीक्ष्ण चोची सज्ज कावळ्यांचा थवा ! – २

निवृत्तीच्या विचारें तो करी विनंती सभेला
" मौंजीबंधना आमुच्या मिळो आदेश आपुला
आळंदीच्या विद्वज्जनीं येथें धाडिले आम्हांला
आम्ही संन्याश्याची मुले अर्ज आमुचा ऐकावा !" - ३

शास्त्री पंडितांनी सर्व धुंडाळिले धर्मग्रंथ
बालकांच्या त्या मुंजीला त्यांना मिळेना शास्त्रार्थ
" संन्याश्याची संतती ही शूद्र आहे जन्मजात
तुम्हां शुद्धी शक्य नाही !" घुमे घोषणा तेधवा - ४

प्रश्न केला निवृत्तीने "मार्ग आम्हां काय आता ?"
धर्माध्यक्ष आज्ञापिती " धरा ब्रह्मचर्य व्रता
करा अवघ्यांची सेवा भावें स्मरा भगवंता
तुम्ही शुद्ध व्हाल अन्तीं मनीं विश्वास हा ठेवा !" - ५

तेथे पखालीचा रेडा दिसे एका निंदकाला
' नाव याचे आहे ज्ञान्या," ज्ञानोबाला तो म्हणाला
" वेदोच्चाराची प्रेरणा देशील तू जरी याला
वंद्य मानू तुम्हां आम्ही साधू आनंदें गौरवा !" - ६

दुर्जना त्या ज्ञानराजा वाचें गंभीर बोलला
" सर्वात्मक ब्रह्म एक व्यापी संपूर्ण विश्वाला
महिषाचा आणि माझा आत्मा मुळी ना वेगळा
तुम्ही गर्वे माजविता उच्चनीच भेदभावा !" - ७

योगीश्वरें त्या स्वकरीं आत्मशक्ती संयोजुनी
माथा स्पर्शिता पशूचा स्फुरे त्याला दिव्य वाणी
" ओम् अग्निमीळे पुरोहितं यज्ञस्य देवं ऋत्विजम् "
वेदघोषा गर्जे म्हैसा थक्क झाला तो मेळावा - ८

धन्य बाळांनो, तुम्ही हो, परब्रह्म स्वयंसिद्ध !
संबोधुनी मुक्तकंठें लीन पदीं ब्रह्मवृंद
डुले मोदें गोदामाई जयनादें दिशा धुंद
आला फुलोनी मोगरा गंधमिठी घाली विश्वा – ९

● ○ ●

# २४ पैठणचा बालेकिल्ला

**निवेदन :–** पैठणच्या जनतेची मने आपल्या प्रेमळ वृत्तीने जिंकून ज्ञानेश्वर आपल्या भावंडांसह आपेगांवी गेले. तेथे कांही दिवस राहून ते नेवासे मुक्कामी आले. पण त्याची कीर्ती तेथे त्याआधीच गेली होती.

तेथील कुलकर्णी त्या समयी मृत झाला होता. त्यांची अंत्ययात्रा नदी-काठावर आली आणि त्यांची पत्नी सती जाण्यास सिद्ध झाली. तेथे वडाखाली विश्रांती घेत असलेले ज्ञानेश्वर कांही लोकांना दिसले. 'रेड्यामुखीं वेद बोलविणारा जादुगार' असे त्यांना समजून त्या मंडळींनी मृत कुलकर्ण्याचे प्रेत त्यांच्यापुढे आणून ठेवले !

ज्ञानेश्वर गंभीर मुद्रेने उद्गारले. "अरे, हा तर सच्चिदानंद आहे. तो मरेलच कसा !" त्यांनी हलकेच आपला हात त्या प्रेतावरून फिरविला. त्या क्षणी तो मृत कुलकर्णी जिवंत झाला. तो ज्ञानदेवांचा एकनिष्ठ भक्त बनला.

ज्ञानेश्वरीच्या अखेरच्या ओवीत ज्याचा ज्ञानेश्वरानी गौरवपूर्वक उल्लेख केला आहे. तोच हा भाग्यवान 'सच्चिनद बाबा !'

पैठणचा बालेकिल्ला ज्ञानरायें जिंकियेला
हरीनामाच्या गजरीं झेंडा भक्तीचा रोविला ।।धृ.।।

निघे भावंडांसंगे तो
बालसंत आळंदीला
मार्गावरी भाविकांची
रीघ लागे दर्शनाला
वेद बोलला तो म्हैसा आळेगावीं शांत झाला ! –१

क्षेत्र नेवासे अनादि
प्रवरेच्या काठीं वसे
शिणे प्रवासें ज्ञानेश
वृक्षातळीं शांत बसे
यशोनाद परी त्याचा तिथे आधीच पोचला – २

ग्रामींचा त्या कुलकर्णी
सदानंद मृत झाला !"
प्रेतयात्रा त्याची आली
नदीकिनारीं त्या वेळा
सती जाया सिद्ध झाली भार्या तयाची सुशीला – ३

"रेड्यामुखीं वेदवाणी"
करी जो हा चमत्कार
जादूगार आला पहा !"
लोक बोलती अधीर
ज्ञानदेवापुढे त्यांनी जड देह तो ठेविला – ४

स्पर्शुनी त्या कलेवरा
योगिराणा त्यांना वदे
"आहे सच्चिदानंद हा
याला कसा मृत्यु बाधे ?"
उठे सत्वरीं ते प्रेत जयघोष जनीं केला ! – ५

सदानंद धरी पायां
म्हणे, "घडो सेवा मला !"
शुद्ध भावा जाणुनी त्या
ज्ञाननाथें शिष्य केला
ज्ञानेश्वरी - लेखकाचा मिळे बहुमान त्याला – ६

● ○ ●

# २५ सांगती ज्ञानेश्वर गीता

निवेदन :– आपल्या अपूर्व ज्ञानप्रभावाने सारे पैठणक्षेत्र गाजवून ज्ञानेश्वरादि भावंडे 'मोहिनीराजा' च्या पवित्र नेवाशास आली. तेथील मुक्कामात निवृत्तीनाथ ज्ञानदेवांना म्हणाले, "आपला सगळा परमार्थ संकृत भाषेत आहे. त्यामुळे सर्व सामान्य लोक अज्ञानात राहून दुःखी झाले. गीता ही सर्व ज्ञानाची गंगोत्री आहे. ती प्राकृत भाषेत कथन करून तू जनतेला सत्यधर्माचे रहस्य सांग व तिच्या उद्धाराचा मार्ग मोकळा कर!" निवृत्तीनाथ हे ज्ञानदेवांचे वडील बंधु आणि पारमार्थिक गुरु! त्यांच्या आदेशा' ाणे प्रवरेच्या काठावरील शिवमंदिरातील एका विशिष्ट दगडी खांबाला टेकून त्यांनी 'ज्ञानेश्वरी' सांगितली आणि आपल्या दिव्य प्रतिभेने जगाला थक्क करून सोडले. 'इये मराठीचिये नगरीं। ब्रह्मविद्येचा सुकाळु करी' हे आपले बोल त्याने अगदी खरे करून दाखविले.

ठेवुनि माथा सद्‌गुरु - चरणीं वंदुनि गणनाथा
सांगती ज्ञानेश्वर गीता ।।धृ.।।

नेवाशातिल शिवालयाला येत नवी शोभा
खिलसे मूर्ती चैतन्याची टेकुनि त्या स्तंभा
सुहास्य वदनीं सभाजनांच्या हर्ष मना देता – १

अभिनव सुंदर शद्बकळा ती फुलवित अणुरेणू
चंद्रघटातुनि मधुबिंदूंची झिरपण होत जणू
शांतरसाने शृंगाराचा गर्व पुरा हरिता – २

कमलांचे रमणीय ताटवे नटले नवरंगें
गुंगत नादें दाहि दिशांचे क्षेपावत भृंगे
तेथिल अवघ्या जडवस्तूंना लाभे चेतनता – ३

उधळित गगनीं इंद्रधनूची नयनरम्य कांती
झुलवित भूवरि नंदनवन ती अपूर्व रसवंती
गूढ मधुर त्या प्रभुवचनांतिल खुलवित भावार्था – ४

मोडुनि ताठा दुराग्रही त्या धर्म-धुरीणांचा
परंपरागत नाशुनि तोरा संस्कृत वाणीचा
सिद्ध करित कीं, प्राकृत भाषा सुयोग्य वेदान्ता ! -५

आत्मबलाने दुर्गम तट तो फोडुनि शतकांचा
खेळविला घरिदारीं निर्मळ प्रवाह ज्ञानाचा
आत्मोद्धारा समर्थ केली अज्ञानी जनता - ६

विश्व मनोहर विशाल मंदिर आम्हां सर्वांचे
जन्मसिद्ध हे अमुचे नाते आहे समतेचे
भक्त खरा तो सर्वांभूतीं पाहे भगवंता ! - ७

अहंपणासह आस फलाची सोडुनि दृढ भावें
प्राप्त कर्म ते करिता मानव परमपदा पावे
इहपर लोकीं तारक दुसरा धर्म न या परता ! - ८

साहित्याचे भूषण झाली रसाळ ती ओवी
भाग्यवती हो माय मराठी दिव्य कला दावी
ब्रह्मरसाच्या रमे सेवनीं पार्थापरि श्रोता - ९

वैष्णवजन हा विश्वप्रेमी सखा अनाथांचा
संतशिरोमणि आद्य प्रवर्तक माणुस-धर्माचा
अर्पी जीवन अखिल जगाच्या कल्याणा करिता - १०

पावन प्रवरातटीं पुण्यमय ज्ञानयज्ञ चाले
आनंदाच्या अमृत डोहीं भाविकजन न्हाले
हरिनामाच्या मंगल गजरीं त्रिभुवन दुमदुमता - ११

● ○ ●

# २६ जय जय ज्ञानराज बोला !

**निवेदन** :– पैठण व नेवासे या दोन्ही क्षेत्रामध्ये ज्ञानेश्वरांनी अलौकिक कर्तृत्व गाजविले. त्यांच्या यशोदुंदुभीचे पडसाद चोहीकडे उमटले. ज्या बालकाला आपण तुच्छ मानून गावाबाहेर पिटाळून लावले, त्याने केलेला हा अपूर्व पराक्रम पाहून सारे आळंदीकर आश्चर्यात बुडून गेले. आपल्या पूर्वकृत्याचा त्यांना खेद झाला, त्याचबरोबर ज्ञानेश्वरांच्याबद्दल त्यांना सानंद अभिमानही वाटला.

आपल्या बंधूसह ज्ञानेश्वर आळंदीस परत येत असल्याची सुवार्ता त्यांना समजली. सारे गांवकरी स्वयंस्फूर्तीने एकत्र आले आणि ज्ञानेश्वराच्या स्वागत-समारंभाची त्यांनी जय्यत तयारी केली. सारी आळंदी गुढ्यापताकांनी आणि तोरणमाळांनी शृंगारली. ज्ञानेश्वरांना मोठ्या आदराने सामोरे जाऊन सर्वांनी त्यांचे सुस्वागत केले आणि वाजत गाजत त्यांची मोठी मिरवणूक काढली. ज्ञानदेवांच्या जयजयकाराने सारे वातावरण निनादून गेले. ह्या भव्य सोहळ्याने माणुसकीला समाजात प्रतिष्ठा प्राप्त झाली.

जय जय ज्ञानराज बोला !
सकल हो, चला स्वागताला ।।
विजयपताका मिरवित आला क्रांतिवीर पहिला
सुमंगल काल खरा गमला ।।धृ.।।

घालुनी सडा रांगोळी
पथि उंच कमानी उभवा
तोरणें बांधुनी दारीं
सुंदर ही नगरी सजवा
ओवाळुनि आरती समर्पू सुमनांच्या माळा – १

नवरंगें खुलती राने
तरुवेली बहरुनि डुलती
झुळझुळती निर्झर हसरे
पाखरे सुस्वरें गाती
गिरिशिखरांना तृणपर्णांना चढली रम्य कळा – २

लखलखे वज्र तेजाचे
भंगला कोट तिमिराचा
भयपाश जिवाचा सुटला
भेटला सखा हृदयींचा
सूर्य उगवला नव्या युगाचा डंका दुमदुमला - ३

पट खंडुनी दांभिकतेचा
सत्याचे दर्शन घडवी
तट भेदुनि अज्ञानाचा
ज्ञान–दीप जगतीं लावी
पददलितांच्या उद्धाराचा मार्ग खुला केला – ४

विश्वचि हे अमुचे घर हो !
सर्व अम्ही मानव बंधू
प्रेम–गुणें जोडुनि हृदये
जीवनीं सुखाने नांदू
परस्परांना सहाय्य देता धरू सुपंथाला – ५

देव आणि भक्तामधला
दूर आडपडदा झाला
भक्तीने मुक्ति–पदाचा
अधिकार लाभला सकळां
मातृमनाचा थोर मिळाला नेता जनतेला – ६

संदेश देत समतेचा
शांतिचा खुले ध्रुवतारा
हो भाग्यवती ही धरती
ये मधुर दिवाळी दसरा
दाहिदिशांतुनि मधुगंधाचा पारिजात फुलला – ७

गवसला निधी नवसाचा
पूर्वपुण्य उदया आले
संतवाणि घुमली श्रवणीं
वैकुंठ भूतळीं नटले
सोन्याचा हा धन्य दिवस हो दिसे अमृताला – ८

○ ● ○

## २७ उघड दार ज्ञानदादा !

निवेदन :– 'संन्याश्याची पोरे' म्हणून ज्ञानेश्वरादि भावंडांचा समाजात अतोनात छळ झाला. त्यांच्या मायपित्यांनी आपल्या चुकीचे प्रायश्चित्त घेतले तरीही त्या निष्पाप बालकांची ससेहोलपट चालूच राहिली. ती चारी भावंडे गावाबाहेर नदीकाठी झोपडीत रहात आणि भिक्षान्नावर आपला चरितार्थ चालवीत. चहुबाजूंनी लोकनिंदेच्या ज्वाळा त्यांच्यावर उमळत होत्या. एके दिवशी या गांजणुकीचा अगदी कहर झाला. ज्ञानेश्वर भिक्षेला गेले असताना एका दुरात्म्याने त्यांच्या झोळीत भिक्षा म्हणून ओंजळभर माती घातली ! अन्नब्रह्माची ही विटंबना ज्ञानदेवांना सहन झाली नाही. ते तसेच झोपडीत परतले आणि पद्मासन घालून प्राणत्यागास सिद्ध झाले ! त्यावेळी मुक्ताबाई व्याकुळ होऊन त्यांना हाका मारू लागली. त्या बालिकेच्या करुण वाणीत ब्रह्मांडाला गहिवर आणण्याचे सामर्थ्य होते. 'ताटी उघडा ज्ञानेश्वरा'– या विनवणीतील खूण ज्ञानेश्वराना पटली आणि त्यांचे क्षुब्ध मन शांत झाले.

उघड दार ज्ञानदादा पुरे राग आता !
तुझ्यासाठी उपाशी ही तुझी ताई मुक्ता ।।धृ.।।

चारी मुले ती अभागी
कुठे थारा नाही जगीं
आग पेटे चहूभागीं
असह्य हो जिणे त्यांना नसे कोणी दाता – १

जाई ज्ञानेश भिक्षेला
एक दुरात्मा त्यावेळा
बोलावुनी वळें त्याला
झोळीमध्ये घाली माती दाखवीत दातां – २

अन्नब्रह्माची हेळणा
ज्ञानदेवा साहवेना
ताट फेकुनी त्या स्थाना
पर्णकुटी त्वरें गाठी चढे क्रोध माथा – ३

बाजार भरे स्वार्थाचा
घेत बळी गरीबांचा
नको संग या जगाचा
पद्मासना रचोनी तो सजे देहपाता – ४

बंद ताटी ती बघून
होत घाबरा सोपान
निवृत्तीही दिसे खिन्न
अश्रु ढाळी मुक्ता बाळी पुन्हा हाक देता – ५

"थोर तुम्ही योगिराज
होऊ नको हा नाराज
अज्ञ आहे हा समाज !
ज्ञानदीप लावुनी त्या दाखवा सुपंथा – ६

सुटे वारा सोसाट्याचा
तोल ढळे का मेरूचा ?
'शांति' धर्म हा संतांचा
वृक्ष आतपीं पोळता छाया करी पांथा – ७

संतपदीं आस तेणे
चिंता जगाची वाहणे
विष घेणे, सुधा देणे !
विवंचना जन्माची ही सांगातीण संता – ८

विश्वरूप तुम्ही स्वता
कोणावरी रागावता
दात–ओठांची ही कथा
तुम्हांविना अनाथांचा नाही दुजा त्राता – ९

जन्मला हो विश्वोद्धारा
ब्रीद्र अंतरीं ते स्मरा
तुम्ही तरा, जनां तारा !
खोला कवाड कृपेचे, नुरे धीर चित्ता – १०

लडिवाळ त्या बोलांनी
निवे ज्ञानराजा मनीं
भेटे बहिणीला क्षणीं
तृप्त झाला जीव त्याचा तिला जेववीता – ११

● ○ ●

## २८ गोड मांडे खावयाला

**निवेदन :–** नेवाशाला 'ज्ञानेश्वरी' निर्मितीचें अलौकिक कार्य पुरे करून ज्ञानेश्वर आपल्या बंधूसमवेत आळंदीस परत आले आणि तेथे राहू लागले. त्या ब्रह्ममूर्ती संतांचा आळंदीच्या नागरिकांनी केलेला भव्य सत्कार-समारंभ तेथील कांही क्रियानष्ट मंडळींना आवडला नाही. त्यामध्ये विसोबा चाटी हा अहंमन्य सावकार प्रमुख होता.

दिवाळीच्या सणाचा तो मंगल दिवस होता. निवृत्तीनाथांना गोड मांडे खाण्याची इच्छा झाली. ज्ञानदेवांनी मुक्ताबाईला तशी सूचना केली. त्यासाठी

परळ आणावा म्हणून मुक्ताबाई कुंभाराकडे गेली. दुष्ट विसोबाने तिला वाटेत गाठले अन् तिच्या हातातला परळ फोडून टाकला. तिचे अश्रु पाहून ज्ञानेश्वर कष्टी झाले. योगसामर्थ्याने आपल्या पाठीचा तवा तापवून मुक्ताकडून त्यांनी मांडे भाजून घेतले आणि निवृत्तीनाथांची इच्छा पूर्ण केली. विसोबा लज्जित होऊन ज्ञानेश्वरांना शरण गेला आणि त्यांचा शिष्य बनला. हाच 'विसोबा खेचर' पुढे नामदेवांचा गुरु झाला.

गोड मांडे खावयाला होत इच्छा निवृत्तीला
लागा तयारीला, सांगे ज्ञानदेव मुक्ताईला ।।धृ.।।

वदे आनंदुनी बाळी "तूप रवा आहे घरीं
छान स्वैपाक करोनी तुम्हां वाढीन सत्वरीं
खापराच्या परळाची उणीव ती भासे मला" – १

घाई सुटे सोपानाला थोपवीत मुक्ता त्यासी
"तुला कळणार नाही स्वस्थ राही दादाशी
पक्का परळ आणिते भेटुनी मी कुंभाराला" – २

तिच्या वाटेमध्ये उभा दुष्ट चाटी विसोबा तो
"काळे करी जा कारटे!" सर्पापरी फूत्कारतो
जाया कुंभार वाड्याला त्याने बंदी केली तिला – ३

गुणी सुन कुंभाराची लक्ष्मी तिच्यापाठीं राही
माजोरी त्या सावकारा मुळी जुमानिले नाही
तिने शोधुनी मुक्तेला दिला परळ चांगला – ४

डोळे वटारुनी तिला गुरकावी श्वान जैसा
झेप घेई मुक्ताकडे रागाने तो होत पिसा
तिचा हिसडोनी हात त्याने परळ फोडिला! – ५

हुंदके ती देत बाला आली मोगरीच्या खाली
हरिपाठ वाचताना ज्ञानोबाने पाहियेली
अर्थ तिच्या आसवांचा त्याच क्षणीं कळे त्याला –६

"साधे खापर मिळेना काय दुर्भाग्य आमुचे ?"
दुःख गिळोनी ज्ञानेश डोळे पुशी बहिणीचे
मांडे कराया त्यावेळा त्याने तिला धीर दिला – ७

पीठ मळोनी ती नीट पानीं केळीच्या थापिते
चेतविला वन्ही पोटीं योगबलें ज्ञाननाथें
तोंडातुनी येती ज्वाला तवा पाठीचा तापला – ८

मांडे सुरेख भाजुनी ताई वाढी तिन्ही भावां
त्यांची मने तृप्त होता हर्ष झाला तिच्या जीवा
मिष्टान्नाच्या वासाने त्या लाळ सुटे विसोबाला – ९

आंचवाया भावंडे ती जाता कुटीच्या बाहेरी
आत शिरे लोभी चाटी उष्टी पाने चाटी सारी
"जा हो चालता, खेचरा !" ज्ञानराया उद्‌गारला – १०

पायां लागुनी तो म्हणे, "क्षमा करा मायबापा !"
निवृत्तीने दिली आज्ञा ज्ञानेश्वरें केली कृपा
भेटे लोहा परीस तो जगीं विसोबा तारिला – ११

● ○ ●

# २९ चांगदेवा गर्व झाला

**निवेदन :–** तापी नदीच्या तीरावर पुणतांबे हे एक प्रसिद्ध क्षेत्र आहे. तेथे पूर्वी चांगदेव (चांगा वटेश्वर) या नावाचे एक महान योगी रहात. चौद वेळा त्यांनी मृत्यूला मागे परतविले होते. आपल्या योगसिद्धीचा त्यांना मोठा अभिमान होता. चौदापंधरा वर्षाचा एक पोरगा 'पैठणाला रेड्यामुखीं वेद बोलवितो' अन् तिथले नंदीबैल त्याला माना डोलवतात, ही वार्ता ऐकून चांगदेवांचा अहंकार दुखावला.

वाघावर स्वार होऊन अन् हातात सर्पाचा चाबूक घेऊन स्वारी मोठ्या

दिमाखाने आळंदीस आली. आपला थाटमाट आणि प्रचंड शिष्यमेळा पाहून ज्ञानेश्वर दिपून जातील हा त्यांचा अंदाज फोल ठरला.

त्याबेळी योगिराज ज्ञानेश्वरांनी आपल्या योग सामर्थ्याने चांगदेवांचा गर्व-परिहार केला. चांगदेव त्यांना शरण गेले. मुक्ताबाईकडून ज्ञानेश्वरांनी चांगदेवांना आत्मबोध करविला आणि त्यांचा उद्धार केला.

'श्रेष्ठ मी सर्वज्ञ योगी चांगदेवा गर्व झाला
गारुडी हा पोर आहे गुंगवी भोळ्या जनाला ।।धृ।।

त्यास द्यावी समज खाशी
बेत योजी तो मनाशी
पाठवाया पत्र वेगें घेत हाती लेखणीला - १

मायना कैसा लिहावा ?
बाप कीं बेटा म्हणावा !
ना कळोनी धाडिले त्या पूर्ण कोऱ्या कागदाला - २

पाहुनी तो लेख कोरा
हसत मुक्ता देत शेरा
'कोरडा हा सिद्धिवेडा !' बाण झोंबे काळजाला - ३

घेत संगें शिष्यमेळा
व्याघ्रपृष्ठीं स्वार झाला
ज्ञानदेवा भेटण्याला थेट आळंदीस आला - ४

ज्ञानरायें नवल केले
अंतराळीं भिंत चाले
योगमाया दिव्य बघता मीपणा त्याचा निमाला - ५

त्याक्षणीं हो लीनचरणीं
बोलला तो दीनवाणी
दीर्घ आयू शाप भासे भार मी झालो जगाला - ६

लाभ घडला दर्शनाचा
मंत्र सांगा मुक्ततेचा
मायबापा हे कृपाळा, उद्धरा या लेकराला !" – ७

ज्ञाननाथें चित्त त्याचे
शांत केले स्निग्ध वाचें
"आत्मदृष्टी प्राप्त ज्याला दूर नाही मुक्ति त्याला !"–८

जाणुनी तो अर्थ मुक्ता
त्यास बोधी भक्तिपंथा
छेदुनीया भ्रांतिपाशा वृद्ध मुनि तो मुक्त केला – ९

● ○ ●

# ३० विठ्ठल सावळा विसावा जिवाचा

निवेदन :– श्री ज्ञानेश्वर हे सर्वसामान्य जनाचे असामान्य नेते होते. त्यांनी दिलेल्या माणूस धर्माच्या शिकवणूकीने सर्व समाजात एक नवे चैतन्य निर्माण झाले. 'पंढरीचा सावळा विठ्ठल हा त्यांचा स्फूर्तिदाता होता आणि हे 'विटेवरचे परब्रह्म' अवघ्या महाराष्ट्राचे अत्यंत लाडके दैवत ! त्यावेळीं नामदेवादि संतांनी पंढरपूरचा परिसर हरिकीर्तनाने दुमदुमून टाकला होता.

आपले जीवित कार्य साध्य झालेले पाहून आपला अवतार संपविण्याचे ज्ञानेश्वरांनी ठरविले. पांडुरंगाच्या भेटीचा त्यांनी ध्यास घेतला. निवृत्तीनाथांसह ते आपल्या माहेरी पंढरपुरी आले. तेथे संत नामदेवांची आणि त्यांची 'भरत भेट' झाली. ज्ञान आणि भक्ति यांचा तो संगम खरोखर अपूर्व होता. नामदेवांना सांगाती घेऊन ज्ञानेश्वरांनी चारी धाम यात्रा पुरी केली. पंढरीस परत आल्यावर संतांच्या मेळाव्यात त्यांनी कीर्तन केले. त्या समयीं "आपुल्या गावा मी जाईन हो आता" हे उद्गार त्यांनी काढले. ते कानावर पडतांच सर्व श्रोत्यांची अंतःकरणे थरारून गेली.

विठ्ठल सावळा विसावा जिवाचा
लागे ध्यास त्याचा ज्ञानदेवा ।।धृ.।।

भूवरी वैकुंठ पंढरी विराजे
नामघोष गाजे तिन्ही लोकीं
धन्य पुंडलीक दाखवी कौतुक
ठाकले सन्मुख परब्रह्म !
हरी - हर प्रेमें एकत्र नांदती
तेजाळली ज्योती अद्वैताची
लावण्य पुतळा पंढरीचा निळा
सुखाचा कोवळा गाभा जसा ! ।।१।।

भेटाया माहेरा आसावला डोळा
भीमा तटीं आला योगिराणा
भक्तराज नामा रंगला कीर्तनीं
तल्लीन श्रवणीं श्रोतेजन
ज्ञानियाने दिली नामयाला मिठी
डोले जगजेठी विटेवरी
ज्ञान - भक्तीच्या त्या संगमीं सुरेख
डुंबती भाविक मुक्तमनें ।।२।।

नको तीर्थयात्रा वाटे नामदेवा
'सांगा या केशवा सोडू कैसा ?'
देव म्हणे माझा "नामा असे प्राण
नीट सांभाळून त्याला न्या हो !"
चालवी ज्ञानेश धरोनी त्या हातीं
वैष्णव नाचती प्रेमानंदें
निवृत्ती सोपान मुक्ताई संगती
निघाली दिंडी ती नवलाची ।।३।।

केली यथासांग    चारी धामयात्रा
आली काशीक्षेत्रा    ज्ञानमूर्ती
शिव आदि गुरु    मनीं संतोषले
सत्वरीं भेटले    शिष्योत्तमा
चाले उभयांचा    सानंद संवाद
घडे आत्मबोध    नामदेवा
विश्वनाथ त्यांना    नेत गंगास्नाना
वोळंगे चरणां    भागीरथी ।।४।।

गोड भक्तिसुधा    वाटीत सकळां
वळे पंढरीला    संत मेळा
'रामकृष्ण हरी'    नाद भिडे नभा
कीर्तनाला उभा    ज्ञानराया
"निवृत्ती - कृपेने    होत मी कृतार्थ
तुम्ही साधुसंत    साक्षी त्यास
आपुल्या गावा मी    जाईन हो आता !"
शद्ब हे ऐकता    स्तब्ध सारे ।।५।।

◡ ● ○

# ३१ प्रेमनिधी ज्ञानराजा

निवेदन :– 'आपले अवतार कार्य संपले. या जगात आता कशाला गुंतून रहा' – हा विचार ज्ञानेश्वरांच्या मनात प्रबळ झाला. निवृत्तीनाथांच्या संमतीने त्यांनी निरंजन समाधी घेण्याचा निश्चय केला. कार्तिकी एकादशीस सारे वैष्णवजन आणि संतमंडळी पंढरीस एकत्र जमली होती. ज्ञानेश्वर समाधी घेणार, ही वार्ता तेथे पसरताच मोठी खळबळ उडाली. संत नामदेव तर फारच व्याकुळ झाले. ज्ञानेश्वरांच्या वियोगाची कल्पना त्यांना असह्य झाली. तथापि श्री पांडुरंगांनी त्यांची आणि भक्तजनांची समजूत घातली.

कार्तिकी–यात्रा आटोपून सर्व संतमंडळी ज्ञानदेवांना निरोप देण्यासाठ आळंदीस आली. स्वतः नामदेवांनी पुढाकार घेऊन श्री विठ्ठलाच्या साक्षीने ज्ञानराजांच्या समाधीची सारी तयारी केली. 'कार्तिक वद्य त्रयोदशी' हा श्रीज्ञानदेवांच्या महाप्रयाणाचा पुण्यदिवस. त्या दिवशी मध्यान्हसमयी हा विश्वप्रेमी महात्मा निजानंदीं निमग्न झाला !

'प्रेमनिधी ज्ञानराजा जातो आपुल्या गावाला'
नामदेव सांगे सर्वां वेगें चला दर्शनाला ।।धृ.।।

कार्तिकी एकादशीला
भक्त आले पंढरीला
भेट एकान्तीं घडे ती
विठूराया दे संमती
घेत संगे रुक्मिणीला स्वता आला आळंदीला – १

इंद्रायणीच्या दों तटीं
दिंड्यापताकांची दाटी
अश्वत्थाच्या तळीं उभा
स्थिती उन्मनी ज्ञानोबा
कैवल्याचा तो पुतळा पांडुरंगें आलिंगिला – २

समाधीचे प्रस्थान ते
योग्य ठेविले मुहूर्तें
मांदी वैष्णवांची मिळे
क्षेत्रप्रदक्षिणा चाले
टाळवीणा मृदंगांचा नाद आकाशीं कोंदला – ३

सिद्धेश्वराच्या प्रसादें
कार्य महत्वाचे साधे
नंदी काढुनी बाजूला
केली जागा समाधीला
कंठ सर्वांचा दाटला अश्रुपूर वाहे डोळा – ४

हरिदिनीं, द्वादशीस
कथा–कीर्तनाचा घोष
त्रयोदशीला सोहळा
गोड पारण्याचा झाला
अन्नपूर्णा जगन्माता दाता श्रीहरी शोभला – ५
बेल तुळशी – फुलांनी
सुशोभित त्या आसनीं
समर्पुनी पुष्पहारा
ओवाळिले ज्ञानेश्वरा
दिव्य प्रभेने तेथला अणुरेणू तेजाळला – ६
नामघोषीं दंग मेळा
आला समाधीच्या स्थळा
वंदी ज्ञानदेव सर्वां
म्हणे निवृत्ती – केशवां
"पाळिला हो तुम्ही लळा, पादपद्मीं ठेवा मला !" – ७
दूर चालली माउली !
खिन्न सारी बाळे झाली
धैर्य – मेरू तो निवृत्ती
करी कासाविशी किती
धाय मोकली सोपान होत मुक्ता शोकाकुला – ८
सान थोरां शांतविता
शीण आला जगन्नाथा
त्याने निवृत्तीसंगती
पुण्यवेळा साधुनी ती
विवराच्या अंतर्भागीं नेले हळू ज्ञानेशाला – ९
पुढे ठेवी ज्ञानेश्वरी
ध्यान पद्मासनीं धरी
निजानंदीं ज्ञाननाथ
मध्यान्हीं हो समाधीस्थ !
उडे आकांत क्षणीं त्या विश्वगोल आंदोळला – १०

# पसायदान

आता विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावें ।
तोषोनि मज द्यावें । पसायदान हे ।।१।।

जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो ।
भूतां परस्परें जडो । मैत्र जीवाचें ।।२।।

दुरिताचें तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्यें पाहो ।
जो जें वांछील तो तें लाहो । प्राणि जात ।।३।।

वर्षत सकल मंगळीं । ईश्वर निष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूमंडळीं । भेटतु भूतां ।।४।।

चला कल्पतरूंचे आरव । चेतना चिंतामणीचे गांव ।
बोलके जे अर्णव । पीयूषाचे ।।५।।

चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।
ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ।।६।।

किंबहुना सर्व सुखीं । परिपूर्ण होउनी तिहीं लोकीं ।
भजिजो आदि पुरुखीं । अखंडित ।।७।।

आणि ग्रंथोपजीविये । विशेषें लोकीं इथे ।
दृष्टादृष्ट विजये । होआवें जी ।।८।।

तेथ म्हणे विश्वेश्वर रावो । हा होईल दान पसावो ।
येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया जाला ।।९।।

● ○ ●

श्रीज्ञानेश्वरमहाराज

# हरिपाठाचें अभंग

॥ श्री गणेशाय नम: ॥

१

देवाचिये द्वारीं उभा क्षणभरी । तेणें मुक्ति चारी साधियेल्या॥
हरि मुखें म्हणा हरि मुखें म्हणा । पुण्याची गणना कोण करी ॥
असोनि संसारीं जिव्हे वेग करीं । वेदशास्त्र उभारी बाह्या सदा ॥
ज्ञानदेव म्हणे व्यासाचिया खुणा । द्वारकेचा राणा पांडवा घरीं ।१।

२

चहूं वेदीं जाण षट्शास्त्रीं कारण । अठराही पुराणें हरीसी गाती।
मंथुनी नवनीता तैसें घे अनंता । वांया व्यर्थ कथा सांडीं मार्ग ॥
एक हरि आत्मा जीव-शिव सम । वांया तूं दुर्गमीं न घाली मन ॥
ज्ञानदेवा पाठ हरि हा वैकुंठ । भरला घनदाट हरि दिसे ॥२॥

३

त्रिगुण असार निर्गुण हें सार । सारासार विचार हरिपाठ ॥
सगुण निर्गुण गुणांचें अगुण । हरिविणें मन व्यर्थ जाय ॥
अव्यक्त निराकार नाही ज्या आकार । जेथूनि चराचरी त्यासी भजे।
ज्ञानदेवा ध्यानीं रामकृष्ण मनीं । अनंत जन्मांनीं पुण्यहोय ॥३॥

४

भावेंवीण भक्ति भक्तिवीण मुक्ति । बळें वीणशक्ति बोलूं नये॥
कैसेनि दैवत प्रसन्न त्वरित । उभा राहें निवांत शिणसी वायां ॥
सायासें करिसी प्रपंच दिननिशीं । हरिसी न भजसी कोण्या गुणें ॥
ज्ञानदेव म्हणे हरिजप करणें । तुटेल धरणें प्रपंचाचें ॥४॥

५

योगयागविधी येणें नोहे सिद्धी । वांयाचि उपाधि दंभधर्म ॥
भावेंवीण देव न कळे निःसंदेह । गुरूविण अनुभव कैसा कळे ॥
तपेंवीण दैवत दिधल्याविण प्राप्त । गुजेंवीण हित कोण सांगे ॥
ज्ञानदेव सांगे दृष्टान्ताची मात । साधूचे संगती तरणोपाय ॥५॥

६

साधुबोध झाला तो नुरोनिया ठेला । ठायींच मुराला अनुभवें।
कापुराची वाती उजळली ज्योती । ठायींच समाप्ती झाली जैसी।
मोक्षरेखे आला भाग्यें विनटला । साधूचा अंकिला हरिभक्त ।।
ज्ञानदेवा गोडी संगती सज्जनीं । हरि दिसे जनीं आत्मतत्वीं ।६।

७

पर्वताप्रमाणें पातक करणें । वज्रलेप होणें अभक्तांसी ।।
नाहीं ज्यांसी भक्ति ते पतित अभक्त । हरीसी न भजत दैवहत ।
अनंत वाचाळ बरळती बरळ । त्यां कैंचा दयाळ पावे हरि ।।
ज्ञानदेवा प्रमाण आत्मा हा निधान । सर्वांघटीं पूर्ण एक नांदे ।७।

८

संतांचे संगतीं मनोमार्गगती । आकळावा श्रीपती येणें पंथें ।।
रामकृष्ण वाचा भाव हा जीवाचा । आत्मा जो शिवाचा राम जप।
एकतत्त्वीं नाम साधिती साधन । द्वैताचें बंधन न बाधिजे ।।
नामामृत गोडी वैष्णवां लाधली । योगियां साधली जीवनकळा।
सत्वर उच्चार प्रल्हादीं बिबला । उद्धवा लाधला कृष्णदाता ।।
ज्ञानदेव म्हणे नाम हें सुलभ । सर्वत्र दुर्लभ विरळा जाणे ।।८।।

९

विष्णूविणें जप व्यर्थ त्याचें ज्ञान । रामकृष्णीं मन नाही ज्याचें ।
उपजोनी करंटा नेणें अद्वय वाटा । राकृष्णीं पैठा कैसा होय ।।
द्वैताची झाडणी गुरुविण ज्ञान । त्या कैंचें कीर्तन घडे नामीं ।।
ज्ञानदेव म्हणे सगुण हें ध्यान । नामपाठ मौन प्रपंचाचें ।।९।।

१०

त्रिवेणीसंगमीं नाना तीर्थें भ्रमी । चित्त नाही नामीं तरी तें व्यर्थ।
नामासी विन्मुख तो नर पापिया । हरिविण धांवया न पावे कोणी।
पुराणप्रसिद्ध बोलिले वाल्मीक । नामें तिन्ही लोक उद्धरती ।।
ज्ञानदेव म्हणे नाम जपा हरिचें । परंपरा त्याचें कुळ शुद्ध ।१०।

११

हरि उच्चारणीं अनंत पापराशी । जातील लयासी क्षणमात्रें ।।
तृण अग्निमेळें समरस झालें । तैसें नामें केलें जपतां हरि ।।
हरि उच्चारण मंत्र पैं अगाध । पळे भूतबाधा भयें त्याचे ।।
ज्ञानदेव म्हणे हरि माझा समर्थ । न करवे अर्थ उपनिषदां ।११।

१२

तीर्थ व्रत नेम भावेंवीण सिद्धी । वांयाचि उपाधी करिसी जना ।।
भावबळें आकळे येरवीं नाकळे । करतळीं आंवळे तैसा हरि ।।
पारयाचा रवा घेतां भूमीवरी । यत्न परोपरी साधन तैसें ।।
ज्ञानदेव म्हणे निवृत्ति निर्गुण । दिधलें संपूर्ण माझे हातीं ।।१२।।

१३

समाधि हरीची सम सुखेंवीण । न साधेल जाण द्वैतबुद्धि ।।
बुद्धीचें वैभव अन्य नाही दुजें । एका केशवराजें सकळ सिद्धी ।।
ऋद्धि सिद्धी निधि अवघीच उपाधी । जंव त्या परमानंदीं मन नाही।
ज्ञानदेवीं रम्य रमलें समाधान । हरीचें चिंतन सर्वकाळ ।।१३।।

१४

नित्य सत्य मित हरिपाठ ज्यासी । कळिकाळ त्यासी नातळती ।
रामकृष्णी वाचा अनंतराशी तप । पापाचे कळप पळती पुढें ।।
हरि हरि हरि मंत्र हा शिवाचा । म्हणती जे वाचा तयां मोक्ष ।।
ज्ञानदेवा पाठ नारायण नाम । पाविजे उत्तम निजस्थान ।।१४।।

१५

एक नाम हरि द्वैतनाम दूरी । अद्वैतकुसरी विरळा जाणे ।।
समबुद्धि घेता समान श्रीहरी । शम-दमांवरी हरि झाला ।।
सर्वांघटीं राम देहादेहीं एक । सूर्य प्रकाशक सहस्त्ररश्मी ।।
ज्ञानदेवा चित्तीं हरिपाठ नेमा । मागिलिया जन्मा मुक्त झालों।१५

१६

हरिनाम जपे तो नर दुर्लभ । वाचेसी सुलभ रामकृष्ण ।।
राम कृष्ण नामीं उन्मनी साधली । तयासी लाधली सकळ सिद्धी ।।

सिद्धी बुद्धी धर्म हरिपाठीं आले । प्रपंचीं निमाले साधुसंगें ।।
ज्ञानदेवा नाम रामकृष्ण ठसा । तेणें दशदिशा आत्माराम ।१६।

१७

हरिपाठकीर्ति मुखें जरी गाय । पवित्रचि होय देह त्याचा ।।
तपाचें सामर्थ्यें तपिन्नला अमूप । चिरंजीव कल्प वैकुंठीं नांदे ।।
मातृपितृभ्राता सगोत्र अपार । चतुर्भुज नर होऊनि ठेले ।।
ज्ञान गूढगम्य ज्ञानदेवा लाधले । निवृत्तीनें दिले माझ्या हाती ।१७।

१८

हरिवंशपुराण हरिनाम कीर्तन । हरीविण सौजन्य नेणें कोणी।।
त्या नरा लाधलें वैकुंठ जोडलें । सकळ घडलें तीर्थाटण ।।
मनोमार्गें गेला तो तेथें मुकला । हरिपाठीं स्थिरावला तोचि धन्य।
ज्ञानदेवा गोडी हरिनामाची जोडी । रामकृष्णीं आवडी सर्वकाळ१८

१९

वेदशास्त्रपुराण श्रुतीचें वचन । एक नारायण सार जप।।
जप तप कर्म हरिविण धर्म । वाउगाचि श्रम व्यर्थ जाय ।।
हरिपाठीं गेले ते निवांतचि ठेले । भ्रमर गुंतले सुमनकळिके ।।
ज्ञानदेवीं मंत्र हरिनामाचें शास्त्र । यमें कुळगोत्र वर्जियेलें।।१९।।

२०

नामसंकीर्तन वैष्णवांची जोडी । पापे अनंत कोटी गेली त्यांचीं ।
अनंत जन्मांचें तप एक नाम । सर्व मार्ग सुगम हरिपाठ ।।
योग याग क्रिया धर्माधर्म माया । गेले ते विलया हरिपाठीं ।।
ज्ञानदेवी यज्ञयाग क्रिया धर्म । हरीविण नेम नाही दुजा ।।२०।।

२१

काळ वेळ नाम उच्चारिता नाही । दोन्ही पक्ष पाही उद्धरती ।।
रामकृष्ण नाम सर्व दोषां हरण । जडजीवां तारण हरि एक ।।
हरिनाम सार जिव्हा या नामाची । उपमा त्या देवाची कोण वानी।
ज्ञानदेवा सांग झाला हरिपाठ । पूर्वजां वैकुंठ मार्ग सोपा ।।२१।।

नित्यनेम नामीं ते प्राणी दुर्लभ । लक्ष्मीवल्लभ तयांजवळी ॥
नारायण हरी नारायण हरी । भुक्ति मुक्ति चारी धरीं त्याच्या॥
हरीविणें जन्म नर्कचि पैं जाणा । यमाचा पाहुणा प्राणी होय ॥
ज्ञानदेव पुसे निवृत्तीसी चाड । गगनाहूनि वाड नाम आहे ॥२२॥

२३

सात पांच तीन दशकांचा मेळा । एक तत्वीं कळा दावी हरि ॥
तैसे नव्हे नाम सर्वत्र वरिष्ठ । तेथें कांही कष्ट न लागती ॥
अजपा जपणें उलट प्राणाचा । तेथें मनाचा निर्धार असे ॥
ज्ञानदेवा जिणें नामेंविण व्यर्थ । रामकृष्णीं पंथ क्रमियेला ॥२३॥

२४

जपतप कर्म क्रिया नेमधर्म । सर्वांघटीं राम भाव शुद्ध ॥
न सोडी हा भावो टाकी रे संदेहो । रामकृष्ण टाहो नित्य फोडी॥
जाति वित गोत कुळशील मात । भजकां त्वरित भावनायुक्त ॥
ज्ञानदेव ध्यानीं रामकृष्ण मनीं । तेणें वैकुंठभुवनीं घर केले ।२४।

२५

जाणीव नेणीव भगवंती नाहीं । हरिउच्चारणीं पाही मोक्ष सदा।
नारायण हरी उच्चार नामाचा । तेथें कळिकाळाचा रीघ नाही ॥
तेथील प्रमाण नेणवे वेदांसी । तें जीवजंतूसी केवी कळे ॥
ज्ञानदेव फळ नारायण पाठ । सर्वत्र वैकुंठ केले असे ॥२५॥

२६

एक तत्त्व नाम दृढ धरी मना । हरीसी करुणा येईल तुझी ॥
तें नाम सोपें रे रामकृष्ण गोविंद । वाचेसी सद्गद जपा आधीं ॥
नामापरतें तत्त्व नाही रेअन्यथा । वांया आणिक पंथा जाशील झणीं।
ज्ञानदेवी नाम जपमाळ अंतरीं । धरोनी श्रीहरि जपे सदा । २६॥

२७

सर्व सुख गोडी साही शास्त्रें निवडी । रिकामा अर्धघडी राहूं नको।
लटिका व्यवहार सर्व हा संसार । वांया येरझारा हरिवीण ॥
नाममंत्र जप कोटी जाईल पाप । रामकृष्णीं संकल्प धरुनी राहें ।

निजवृत्ति हे काढी सर्व माया तोडी । इंद्रियांसवडी लपूं नको ॥
तीर्थी व्रतीं भाव धरी रे करुणा । शांतिदया पाहुणा हरि करी ॥
ज्ञानदेवा प्रमाण निवृत्तिदेवी ज्ञान । समाधि संजीवन हरिपाठ ।२७।


२८

अभंग हरिपाठ असती अठ्ठावीस । रचिले विश्वासें ज्ञानदेवें ॥
नित्य पाठ करी इंद्रायणीतीरीं । होय अधिकारी सर्वथा तो ॥
असावें एकाग्री स्वस्थ चित्त मन । उल्हासें करून स्मरण जीवीं ॥
अंतकाळीं तैसा संकटाचे वेळीं । हरि त्या सांभाळी अंतर्बाह्य ॥
संतसज्जनांनी घेतली प्रचीती । आळशी मंदमती केवी तरे ॥
श्रीगुरु-निवृत्तिवचन प्रेमळ । तोषला तात्काळ ज्ञानदेव ॥२८॥

२९

कोणाचें हें घर हा देह कोणाचा । आत्माराम त्याचा तोचि जाणे।
मी तूं हा विचार विवेकें शोधावा । गोविंदा माधवा याच देहीं ॥
ध्येय ध्याता ध्यान त्रिपुटीवेगळा । सहस्रदळीं उगवला सूर्य जैसा ॥
ज्ञानदेव म्हणे नयनांची ज्योती । या नांवें रूपे ती तुझी जाणा ।२९

॥ इति श्रीज्ञानदेव हरिपाठ समाप्त ॥



जय जय रामकृष्ण हरी

श्री कृष्णार्पणमस्तु !

# ३२ पुत्र अमृताचा

लोकहितासाठी करि जो होम जीवनाचा
धन्य संत ज्ञानेश्वर तो पुत्र अमृताचा ॥ ध्रु० ॥

घोर निशा भवती पसरे
सोसाटत वादळ–वारे
गहन तमीं घुमवी मंगल घोष जागृतीचा –१

काळखड्ग लटकत माथां
तीक्ष्ण बाण हृदया भिडता
लाभ दिला जनसामान्या ज्ञानप्रकाशाचा –२

झेलुनी अश्रु दीनांचे
दूर करी शल्य उरींचे
मार्गसुगम दावी सकलां आत्मविकासाचा –३

मोगरा मनोहर फुलला
मधुगंध जगीं दरवळला
स्वर्गाहुनि सुंदर भासे थाट धरित्रीचा –४

पर्व खुले नवभाग्याचे
मुख उजळे माणुसकीचे
सूर जुळे संसारीं या सौख्य–शांततेचा –५

शुद्ध भाव नांदत जेथे
देव सदा सन्मुख तेथें !
सफल होत सत्कर्माने जन्म मानवाचा –६

राउळीं विराजे ज्योती
नम्र मी समाधीपुढती
सुखवी मन जीवा प्रेमळ स्पर्श माउलीचा –७

## ३३ अन्तरींचे गुज

आभाळीची ज्योत आळंदीत आली
सर्वांगीं फुलली वसुंधरा ।। धृ. ।।

मोर सुवर्णाचा नाचे थुई थुई
झुले आम्बराई आनंदाची
राउळाच्या द्वारीं वृक्षराज उभा
शोभे दिव्य प्रभा गाभाऱ्यात
गुज अन्तरींचे सांगे इंद्रायणी
गुढी त्रिभुवनीं झळकली ।। १ ।।

संत सज्जनांचे पुण्य आले फळा
जगीं प्रगटला ज्ञानभानु !
कळा कस्तुरीची चढे मृत्तिकेला
पदीं लीन झाला कळिकाळ
वर्णिला आवडी गीतार्थ गोमटा
चमत्कार मोठा सर्वांत हा ! ।। २ ।।

डोलवी जिवाला बोल अमृताचा
भार प्रपंचाचा निवारिला
शाश्वत सुखाची दिली जनां ठेव
हृदयींचा देव जागविला
खरा हितकर्ता दयावंत दाता
ऐसा सखा आता दिसे कोठे ? ।। ३ ।।

० जय जय रामकृष्ण हरी ! ०

REFBK 0022513

REFBK-0022513